मुक्प्रत

मा. स्थायी समिती

सभा दि. ०१/०१/२०१०

प्रकरण क्र. २५ ते ३४

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०१/०७/२०१०.

## मा. स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- ०४ दिनांक ०१/०७/२०१०**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ------------------------------------

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. ०७/०७/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०४, दि. ०१/०७/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील) करिता
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०४, दि. ०१/०७/२०१० सोबतची विषय पत्रिका
सभा बुधवार दि. ०७/०७/२०१०

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| २५ | दि. १७/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| २६ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मैदानाचे भाडे ठरविणे बाबत विचार विनिमय करुन निर्ण घेणे. |
| २७ | एमएमआरडीए कडील कर्ज परतफेड करणेबाबत. |
| २८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) हॉस्पीटल मधील ब्लड बँक करीत वातानुकुलीत यंत्रणा बसविणे. |
| २९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजीकरण व लसीकरणाच्या कामा मुदतवाढ देणेबाबत. |
| ३० | एमएमआरडीए कडून निर्मळ अभियान अंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयाच्या कामाचा आढा घेणे. |
| ३१ | पाणी पुरवठा विभागाच्या कामकाजाचा आढावा घेणे. |
| ३२ | माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत देणेबाबत. |
| ३३ | मिरा भाईंदर नगरपालिकेच्या हद्दीत प्लास्टीक पिशव्यांवर बंदी घालणेबाबत. |
| ३४ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (लेखा विभाग) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

दिनांक :- ०१/०७/२०१०.

(हरेश ल. पाटील) ~~करीता~~
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिति सभा सुचना क्रमांक ०४, दि. ०७/०७/२०१० सोबतची विषय पत्रिका

~~बुध~~ सभा बुधवार दि. ७/०७/२०१०

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| | मागील सभांचे इतिवृत्तांत – |
| २५ | दि. १७/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिति सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| --- | विनंती अर्ज - निरंक |
| --- | परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - निरंक |
| --- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज - |
| २६ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मैदानाचे भाडे ठरविणे बाबत विचार विनिमय करुन निर्ण घेणे. |
| २७ | एमएमआरडीए कडील कर्ज परतफेड करणेबाबत. |
| २८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) हॉस्पीटल मधील ब्लड बँक करीत वातानुकुलीत यंत्रणा बसविणे. |
| २९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजीकरण व लसीकरणाच्या कामा मुदतवाढ देणेबाबत. |
| ३० | एमएमआरडीए कडून निर्मळ अभियान अंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयाच्या कामाचा आढा घेणे. |
| ३१ | पाणी पुरवठा विभागाच्या कामकाजाचा आढावा घेणे. |
| ३२ | माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत देणेबाबत. |
| ३३ | मिरा भाईंदर नगरपालिकेच्या हद्दीत प्लास्टीक पिशव्यांवर बंदी घालणेबाबत. |
| ३४ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (लेखा विभाग) |
| --- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे |
| --- | समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक |

दिनांक :- ०१/०७/२०१०.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. स्थायी समिती सभा

# दि. १७/१२/२००९

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. १७/१२/२००९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक १७/१२/२००९ रोजी सभा सुचना क्र. १५ दि. १०/१२/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. दिनेश दगडू नलावडे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| ३) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ५) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ६) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ७) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ८) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ९) | सौ. प्रभात प्रकाश पाटील | -- | सदस्या |
| १०) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| ११) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| १२) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| १३) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |
| १४) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |
| १५) | सौ. अनिता ज. पाटील | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

मा. स्थायी समितीचे सर्व सन्मा. सदस्य, यांचे सर्वांचे सर्वप्रथम मी स्वागत करून मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक साहेब, महानगरपालिकेचे सचिव श्री. हरेश पाटील, मा. उपायुक्त, महानगरपालिकेचे सर्व अधिकारी यांचे सर्वांचे स्वागत करून सचिव साहेबांना विनंती करतो की, आपण सभेला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

मा. सभापतींच्या परवानगीने, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. १७/१२/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १५, दि. १०/१२/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. मागील सभेचे इतिवृत्तांत. प्रकरण क्र. ८५ दि. २२/०५/२००९ व दि. २२/०५/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत.

**अनिल सावंत :-**

दि. २२/०५/२००९ व दि. २२/०५/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ८५ :-**

दि. २२/०५/२००९ व दि. २२/०५/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ७५ :-**

दि. २२/०५/२००९ व दि. २२/०५/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

सुचक :- श्री. अनिल सावंत अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८६, केंद्रशासनाच्या (JNNURM) योजने अंतर्गत ५० बस चेसीज खरेदी करुन त्यावर बॉडी बिल्डींग करण्याच्या दोन स्वतंत्र कामाच्या निविदांना मंजूरी देणेबाबत. (दि. ०९/१२/२००९ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७७)

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, मागच्या वेळेला १२८७ म्हणून रेट जास्त आहे ते कमी यायला पाहिजे होते असे सगळयांचे म्हणणे होते. त्याप्रमाणे आम्ही टाटाच्या अधिकाऱ्यांना समक्ष बोलवलेले आहे. आणि आपण म्हणता त्याप्रमाणे वस्तुस्थिती नाही. यामध्ये बसचे जे मॉडेल निघालेले आहेत. त्यामध्ये बदल सुचवलेले आहेत. त्यामुळे रेट वाढलेले आहेत. इंजिन युरो-२ असतात, त्यावेळेला कमी किंमत असते. ३ युरोचे असल्यामुळे ५० हजाराने वाढ केलेली आहे. एअर स्पेसिफीकेशन यामध्ये लिंक स्प्रींग स्पस्पेन्शन न्युमिमॅटीक सस्पेन्शन ऑन्सस रिअर एक्सल हे दिड लाखाने वाढलेले आहे. गेअर बॉक्स ४० जीबीएस तिथे ६० जीबीएस चा असल्यामुळे ४० हजाराने वाढलेले आहेत. क्लच डायमीटर ३३० एमएम तिथे ३५२ एमएम ते दोन हजाराने वाढलेले आहे. लॉग मेंबर फेब २२३ एमएम तिथे २८५ एमएम पाच हजाराने वाढलेले आहे. आऊट रिगर ऑफ बॉडी माऊटींग या मॉडेलमध्ये नाही आणि बसच्या मॉडेलमध्ये आहे. त्यामुळे बावीस हजाराने वाढलेले आहे. टायर साईज ९.२० चे असते. आणि या बसला ९.२० चे नायलॉन आहे. आणि हे १०.२० चे रेडियल त्यामुळे ४९ हजाराने वाढलेले आहे. असे ३ लाख १८ हजाराने किंमत वाढलेली आहे. त्यामुळे आपल्याला जे १२८७ जास्त वाटत होते आणि पाऊणे दहा लाखाला मिळेल असे वाटत होते. त्या डिलरनेपण सांगितले की, तो मॉडेल नाही. पण यापेक्षा जास्त माहिती आवश्यक असल्यास त्या अधिकाऱ्यांना मी उपस्थित ठेवले आहे आणि ती सेंट्रल गव्हर्नमेंटची स्किम आहे. आणि ५० टक्के सेंट्रल गव्हर्नमेंटकडून मिळणार असल्यामुळे हे डिसेंबर पूर्वी रोडवर गाडी यायला पाहिजे होती. आपल्या मा. स्थायी समितीची रचना करायला आणि विषय यायला उशिर झाला. तरी देखील आम्ही तुमच्यापुढे आणलेले आहे. तुम्ही याचा विचार करा आणि जास्त माहिती हवी असेल तर टाटाच्या अधिकाऱ्यांना बोलावलेले आहे. त्यांच्याकडून तुम्हाला अजूनही काही माहिती आवश्यक असल्यास ते घ्यावे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, चेसीजची मॅन्युफॅक्चरींग डेट काय आहे?

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपल्या पहिल्या मिटींगमध्ये त्याची नऊ लाख पंचेचाळीस हजार अशी आपण किंमत काढली होती. त्यावेळेची वस्तुस्थिती अशी होती की, त्याच्यात आपल्याला एक तर मॉडेल नंबर माहिती नव्हता. मॉडेल नंबर माहिती पडल्यानंतर ती युरो-२ आहे की, युरो-३ आहे याचा कुठचाही उलगडा नव्हता. त्याच्यात आत्ता ज्या ॲमेनिटीज वाढल्या गेल्या आहेत. एअर स्पेन्सर बोला, फ्लोअर हाईट बोला. हे सगळे नसल्यामुळे याचा गैरसमज सगळ्या सदस्यांमध्ये पण झालेला आहे आणि कमिशनर साहेब एवढे अभ्यासू असून त्यांना सुध्दा त्यावेळेला गप्प बसावे लागले. कारण त्यांना त्याची पूर्ण माहिती नव्हती. त्याच्यामुळे त्यांना ते बोलता आले नाही. त्याच्यामुळे सर्व सदस्यांनी, आत्ता त्यांनी ज्याप्रमाणे माहिती दिलेली आहे. जे कंपनीचे डिलर आहेत, त्यांना त्यांनी इथे बोलवलेले आहे आणि आपल्याला पूर्ण माहिती पाहिजे असेल, श्री. कुरेशी साहेब, आपण आत्ता आलात. कारण त्यावेळेला मॉडेल नंबर माहिती नव्हता. युरो-३ की, युरो-२ हे माहिती नव्हते. आत्ता युरो-३ आहे, त्याच्यात एअर स्स्पेन्शन आहे, फ्लोअर हाईट आहे. आणखीन बऱ्याचशा काहीतरी ॲमिनीटी त्याच्यात केलेल्या आहेत आणि त्या हिशोबाने त्याची किंमत १२ लाख ८७ हजार रूपये झालेली आहे. तर आत्ता आपल्याला जी काही माहिती विचारायची आहे. कारण मी आमच्या डिलरला विचारल्यानंतर त्यानेसुध्दा सांगितले आहे की, एअर सस्पेन्शन याची किंमत काय आहे हे मला काढता येणार नाही. आणि ही त्याच्यात एक्स्ट्रा फिडींग आहे. त्या फिल्डमध्ये असणाऱ्या व्यक्तीला आणून ते चेक करणार आहोत. आणि ह्या सगळ्या वस्तू ज्या आत्ता ॲड झालेल्या आहेत, याची सगळी नोंद आपले जे ॲग्रीमेंट बनते त्याच्यात आली पाहिजे. आणि सगळ्या गोष्टीची नोंद त्याच्यात राहिली पाहिजे. आणि त्या पध्दतीने त्या फिल्डमध्ये असलेल्या व्यक्तीला घेऊन आम्ही ते चेक करणार.

**मा. आयुक्त :-**

मागच्या वेळेला झाले त्यामुळे मी नर्वस झालो होतो. परंतु असा विषय मी कधी आणणार नाही. पण आमच्या अधिकाऱ्यांनी अभ्यास करून यायला पाहिजे होते. ते केले नव्हते. म्हणून आम्ही सविस्तर असा विषय आम्ही आणणारच नाही की, इतरांपेक्षा आमच्याकडे जास्त आहे.

**जुबेर इमानदार :-**

मा. आयुक्त साहेब, त्या चर्चेमध्ये आपण माहिती दिली होती. त्याच्यामध्ये काही त्रुटी होत्या. दिल्लीला त्या लोकांनी ज्या बसेस सप्लाय केल्या होत्या किंवा ठाण्यालाही घेतलेल्या बसेसमधून ५-६ बसेस निकृष्ठ दर्जाच्या निघाल्या. दिल्लीला बसेस दिल्या होत्या त्यांना आग लागली होती. त्या काही त्रुटी त्याच्यामध्ये शिल्लक होत्या. त्याच्यामध्ये त्यांनी काही सुधार केलेला आहे का? त्याची तुम्ही त्यांच्याकडून माहिती घेतली आहे का? दिल्ली मे आपके सीएनजी के बसेस को आग लगी....

**मदन उदितनारायण सिंह :-**

दिल्ली मे हुआ। थाना मे हुआ।

**जुबेर इनामदार :-**

सेकंडली ठाणा मे भी आप लोगोने बंसेस सप्लाय किए थे। उसमे से भी जो पाच बसेस है, उनकी कम्प्लेंट बहोत ज्यादा आयी है। टेक्नीकल स्पेसिफीकेशन मे या टेक्निकल डिफीकल्टीज आयी है। तेरा बस मे तो वो इसमे क्या प्रॉब्लेम था? यह सही स्पेसिफिकेशन की बसेस थी क्या?

**प्रतिनीधी (टाटा) :-**

सर यह जो गाडी ठाणा में दि है, यह सीएनजी गाडी है। और आपके यहा पर जो गांडी चल रही है, वह डिझेल की है।

**जुबेर इनामदार :-**

हमे आप दे रहे है वो डिझेल है, सीएनजी नही है? यह जेएनएनयुआरएम के स्पेसीफिकेशन के हिसाब से आप डिझेल बना रहे है या, इझ इट....

**प्रतिनीधी :-**

ॲझ पर जेएनएनयुआरएम.

**जुबेर इनामदार :-**

उन्होंने इस तरह से मांगा है?

**प्रतिनिधी (टाटा) :-**

जेएनएनयूआरएम ने स्टॅंडर्ड स्पेसिफीकेशन बनाया है। उस हिसाब से ही मॅन्युफॅक्चरिंग किया है। डिझेल के अलग और सीएनजी के अलग।

**मदन उदितनारायण सिंह :-**

ठाना मे जो सीएनजी दिए है। वह भी जेएनएनआरयुएम के स्पेसिफीकेशन के हिसाब से ही दिए है ना?

**प्रतिनिधी (टाटा) :-**

जी हॉ ।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो यहा डिझेल क्यों दे रहे है?

**प्रतिनिधी (टाटा) :-**

सर, आपका रिक्वायरमेंट डिझेल का है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

और दिल्ली मे जो बसेस मे ॲक्सीडेंट हो रहा है?

**प्रतिनिधी (टाटा) :-**

सर, उनका लो फ्लोअर एन्ट्री बसेस है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

अपना भी लो फ्लोअर है?

**मा. आयुक्त :-**

दिल्लीला सीएनजी कम्प्लशन केलेले आहे. म्हणजे २००४ सालापासून आणि इतर भागामध्ये अजून सीएनजी कम्पलशन केलेले नाही. दुसरी महत्वाची गोष्ट, आत्तापर्यंत आपण ठेकेदारामार्फत बस चालवत हातो. आणि ते नुकसान आहे, ते महापालिका देत होती. आत्ता, १ तारखेरपासून एखाद्या वेळेस ऑक्ट्रॉय टेन्टेटेली बंद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थिती कोलमडणार आहे. याचा विचार करून आम्ही ज्यावेळेला या बसचे प्रपोजन दिले होते. त्यावेळेला बस ठेकेदाराने घ्यायची आहे. कंडक्टर, ड्रायव्हर, डिझेल, पेट्रोल, मेन्टेन्स हे त्यांच्याकडे आहे. आम्हाला पर किलोमीटर रॉयल्टी किती देणार याचे टेंडर काढणार आहे. तो विषय मी मा. महासभेपुढे पाठवणार आहे. म्हणजे कंडक्टर-ड्रायव्हरचे किमान वेतन दिले का? त्यांना ड्रेस दिले का? याच्याशी आपला काही संबंध राहणार नाही. आपल्याला दर किलोमीटरला रॉयल्टी किती देणार, हा विषय मी मा. महासभेपुढे देणार आहे. बस बॉडी बांधकामाचे दिल्यानंतर आपल्याला स्टेट गव्हर्नमेंट, सेंट्रल गव्हर्नमेंटकडून ५० टक्के मिळणार आहेत. ५० टक्के रक्कम त्यांनी घालायची आहे आणि आम्हाला पर किलोमीटर रॉयल्टी काय देणार, सगळे त्यांनी बघून. अशा तऱ्हेने टेंडर काढायचे. त्यामुळे त्यांना सीएनजी करायचे असेल तर ते सीएनजी करून घेतील किंवा डिझेल करायचे असेल तर डिझेल राहिल.

**जुबेर इनामदार :-**

जेएनएनआरयुएम च्या स्पेसिफीकेशनमध्ये.......

**मा. आयुक्त :-**

आमच्या स्पेसिफीकेशनप्रमाणे आम्ही डिझेलचे दिलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे ते जेएनएनआरयुएम स्पेसिफीकेशन असेल ना? आपले नसेल?आपण सुचवलेले त्याच्यामध्ये काहीच नाही?

**मा. आयुक्त :-**

काही नाही.

**प्रतिनिधी (टाटा) :-**

अॅझ पर जेएनएनआरयुएम सेकेंडली यहा से सीएनजी का अव्हेलब्रीलिटी प्रॉब्लेम होने की वजह से आप लोगो ने डिझेल का ही रिक्वायरमेंट दिया है।

**मा. आयुक्त :-**

सीएनजी ला फार मोठी लाईन लावावी लागते आणि तेवढे पेट्रोल पंप तयार झालेले नाहीत. दोन-दोन दिवस लाइनमध्ये उभे राहून गॅस घेऊन मग चालू करायचे. म्हणजे ते दिवस खोळंबा होईल आणि आपण त्यांच्याकडून दहा वर्षाची गॅरेंटी अॅग्रीमेंटमध्ये करून घेणार ही अट घालूनच मी ही शिफारस केलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

गॅरेंटी और वॉरंटी?

**प्रतिनिधी (टाटा) :-**

वॉरंन्टी.

**मदन उदितनारायण सिंह :-**

चेसी. का मॅन्युफॅक्चरिंग डेट क्या है?

**मा. आयुक्त :-**

हम वर्क ऑर्डर देनेके बाद डेट देंगे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

कब की मॅन्युफॅक्चरिंग देंगे? लेटेस्ट देंगे कि पुरानी देंगे?

**प्रतिनिधी (टाटा) :-**

लेटेस्ट.

**मदन उदितनारायण सिंह :-**

और अगर पुरानी आयी तो?

**प्रतिनिधी (टाटा) :-**

पुरानी गाडी ही नही है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

साहेब, मॅन्युफॅक्चरिंग डेट लेटेस्ट आली पाहिजे, जुने नाही आले पाहिजे. नही तो इनके पास पुराना लॉट, फॉल्टी लॉट पडा हुआ है वही देंगे।

**प्रतिनिधी (टाटा) :-**

सर मेरा रिक्वेस्ट है, यह सब गाडीया अॅझ पर जेएनएनआरयुएम स्पेक्ट बन रही है। तो ओल्ड गाडी होने का सवाल ही नही। इसमे एअर सस्पेन्शन सब है। जो आज तक नही दे रहे थे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

दिल्ली मे जो दुर्घटना हुयी, वह सब सीएनजी है?

**प्रतिनिधी (टाटा) :-**

सीएनजी मे भी अगर आप कल रात का न्युज देखेंगे तो उन्होने कुछ रूटसे गाडीया हटा दि है। बिकॉझ ऑफ दी रोड कंडिशन.

**मदन उदितनारायण सिंह :-**

टाटा के सीएमडी ने माना था की, वह हमारी खामियॉ है, जिसकी वजह से आग लग रही है।

**प्रतिनिधी (टाटा) :-**

खामीयॉ है। लेकिन यह जो ४०० एमएम की हाईट उन्होन्हे ली है......

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, ठराव वाचतो. केंद्र शासनाने जेएनएनआरयुएम योजनेअंतर्गत ५० बस चेसीज खरेदी करून त्यावर बॉडी बिल्डींग करण्याच्या दोन स्वतंत्र कामाच्या निविदांना मंजूरी देणेबाबत गोषवाऱ्याप्रमाणे ठराव वाचला आहे. काम क्र. १ मध्ये प्राप्त झालेल्या निविदांमध्ये टाटा मोटर्स यांचा दर सर्वात कमी असून केंद्र शासनाने अपेक्षित केलेल्या किंमतीपेक्षा कमी असून वाजवी आहे. चेसीच्या गुणवत्तेबाबत मे. टाटा मोटर्स यांच्याकडून लेखी हमीपत्र घेऊन निविदेतील टेक्नीकल स्पेसिफीकेशनप्रमाणे ५० बस चेसीस

पुरवठा करणेच्या कामाबाबत मे. टाटा मोटर्स यांची निवीदा मान्य करण्यास हरकत नाही. काम क्र. २ मधील प्राप्त झालेल्या निविदांमधील दरात वाटाघाटी करून निश्चित केलेल्या दरात काम समान प्रमाणात चारही निविदाधारकांस देण्यास हरकत नाही. सदर दोन्ही कामे पूर्ण करून नवीन बस प्रत्यक्ष शहरातील रस्त्यावर धावणेकामी केंद्र शासनाने कालमर्यादा दिली असून ती दि. ३१/१२/२००९ अशी आहे. त्याबाबत शासन स्तरावर वेळोवेळी आढावा घेतला जात असल्याने कालमर्यादेत काम पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे काम क्र. २, ५० चेसीस वर स्पेसिफीकेशन नुसार फॅब्रीकेशन करून बॉडी बांधणेबाबत प्राप्त निविदाधारकांना समान प्रमाणात कामाचे वाटप केल्यास कालमर्यादेत काम पूर्ण होणे शक्य होईल. काम क्र. १ मध्ये २ बाबत वरीलप्रमाणे निविदेतील दरास त्याकामी येणाऱ्या खर्चास या अगोदर मा. स्थायी समिती सदस्यांनी लिखीत मान्यता दिलेली आहेत. वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकन करून मी हा ठराव मांडत आहे.

**बर्नट डिमेलो :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये एक मुद्दा सांगायचा राहिला आहे. १२.८७ मध्ये ऑक्ट्रॉय ३ टक्के ने ३८ हजार ६२७. नंतर वॅट १२.५ टक्के ने १ लाख ६० हजार ९४७. ऑक्ट्रॉय आणि वॅट हे १२.८७ मध्ये इन्क्लुड आहेत. म्हणजे हे स्पेसिफीकेशनप्रमाणे ३.१८ अधिक हे जर मायनस केले तर रेट त्यापेक्षाही खाली येईल.

**अनिल सावंत :-**

पण ते वॅट माफ होणार आहे का?

**मा. आयुक्त :-**

वॅट माफ होणार नाही. आपण ते करायचे ठरवले आहे. कारण आपल्याला सेंट्रल देणार नाही.

**अनिल सावंत :-**

पण आपण शासनाकडे पाठवले होते.

**शरद पाटील :-**

पण आपल्याला ऑक्ट्रॉय माफ करता येईल ना.

**मा. आयुक्त :-**

आपण जरी ऑक्ट्रॉय माफ केला. तरी तुमच्याकडून मंजुर करून घेतले तर ठेकेदाराला आपण दयावे लागेल ना.

**याकुब कुरेशी :-**

तुमच्या म्हणण्याप्रमाणे १ तारखेपासून ऑक्ट्रॉयच बंद होणार आहे. तर १ तारखेच्या अगोदर आपल्याकडे बसेस येणार का?

**मा. आयुक्त :-**

बसेस येणार नाहीत. आपण परस्पर चेसी देणार आहेत. ऑक्ट्रॉय वाचवता आला तर वाचवू.

**याकुब कुरेशी :-**

पण ऑक्ट्रॉयच जातो आहे तर प्रश्न येत नाही.

**मा. आयुक्त :-**

चेसी जिथे बॉडी बांधकाम करणार आहेत, तिथल्या तिथे परस्पर जाईल. गावात येताना ऑक्ट्रॉय लागणार. तोपर्यंत लागणार नाही. पण तुम्हाला मुद्दाम दर कसा खाली आला.....

**याकुब कुरेशी :-**

आपली तेवढी बचत होईल.

**मा. आयुक्त :-**

पण वॅट लागणार. वॅट आपल्याला भरावा लागणार सेंट्रल गव्हर्नमेंट वॅटवर अनुदान देणार नाही.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव दहा वर्षाच्या गॅरेंटीचे नमुद करून सदर ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

सचिवांना वाचू द्या.

**शरद पाटील :-**

ॲग्रीमेंटमध्ये ज्या अटीशर्ती दिल्या आहेत त्या आपल्या ठरावात नमुद करायची गरज नाही ना?

**मा. आयुक्त :-**

मा. स्थायी समितीच्या वेळेला श्री. शरद पाटील आणि श्री. याकुब कुरेशी या दोघांच्या सह्या घेतल्यानंतरच ॲग्रीमेंट करा. म्हणजे ते सगळ्या कंडीशन वाचून घेतील.

**नगरसचिव :-**

केंद्रशासनाच्या (JNNURM) योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरातील परिवहन सेवेकरीता ५० बस खरेदी करण्याचे आयोजन केलेले आहे व त्या अनुषंगाने मनपाने दि. २०/०८/२००९ च्या **"महाराष्ट्र टाईम्स"**, **"लोकमत"** व **"इकॉनॉमिक टाईम्स"** या दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दी

करुन Technical specifiacation नुसार १) ५० बस चेसीज पुरवठा करणे व २) प्राप्त चेसीजवर Technical specifiacation प्रमाणे फॅब्रीकेशन करुन बॉडी बांधून देणेच्या कामांकरीता स्वतंत्र्य निविदा मागवण्यात आल्या होत्या. तद्अनुषंगाने खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

**क्रमांक १ :- ५० बस चेसीज पुरवठा करणे.**

| अ.क्र. | कामाचा तपशिल | निविदाधारकाचे नाव देकाराची रक्कम | |
|---|---|---|---|
| | | मे. टाटा मोटर्स | मे. अशोक लेलॅन्ड |
| १. | Technical specifiacation प्रमाणे ५० बसच्या चेसीज पुरवठा करणे. | रु. १२,८७,५७६/- | रु. १३,३५,२९६/- |

वरील निविदाधारक हे थेट उत्पादक असून त्यांनी निविदेत नमूद केलेले दर हे **"शासकीस दर"** नुसार आहेत व निविदेतील दरात वाटाघाटी करणे संयुक्तिक राहणार नाही.

**क्रमांक १ :- ५० बस चेसीजवर बॉडी बिल्डींग करणे.**

| अ.क्र. | कामाचा तपशिल | मे. आरको इंजिनिअर्स | | मे. अॅन्थोनी गॅरेज प्रा. लि. | |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | Technical specifiacation प्रमाणे ५० बस चेसीजवर Fabrication करुन बॉडी बिल्डींग बांधणे | रु. ७,१६,२००/- | रु. ६,९०,०००/- | रु. ७,१५,०००/- | रु. ६,९०,०००/- |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | मे. आरको इंजिनिअर्स | | मे. अॅन्थोनी गॅरेज प्रा. लि. | |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | Technical specifiacation प्रमाणे ५० बस चेसीजवर Fabrication करुन बॉडी बिल्डींग बांधणे | रु. ७,१५,७२०/- | रु. ६,९०,०००/- | रु. ७,१५,०००/- | रु. ६,९०,०००/- |

उक्त कामाच्या निविदेतील दराबाबत वाटाघाटी करुन ते कमी केले आहेत. वाटाघाटी नंतर निश्चित केलेल्या दरामुळे महानगरपालिकेचे रु. १२,८२,६४०/- इतके वाचणार आहेत. सदर कामाच्या वाटाघाटीनंतर निश्चित केलेले दर मान्य असलेबाबत निविदाधारकांनी मनपास लेखी कळविले आहे.

काम क्र. १ मध्ये प्राप्त झालेल्या निविदांमध्ये **"मे. टाटा मोटर्स"** यांचा दर सर्वात कमी असून केंद्रशासनाने अपेक्षीत केलेल्या किंमतीपेक्षा कमी असून वाजवी आहे. चेसीजच्या गुणवत्तेबाबत मे. टाटा मोटर्स यांचेकडून लेखी हमीपत्र घेवून निविदेतील Technical specifiacation प्रमाणे ५० बस चेसीज पुरवठा करणेच्या कामाबाबत **"मे. टाटा मोटर्स"**यांची निविदा मान्य करणेस हरकत नाही.

काम क्र. २ मध्ये प्राप्त झालेल्या निविदांमधील दरात वाटाघाटी करुन निश्चित केलेल्या दरात काम समान प्रमाणात चारही निविदाधारकांना देणेस हरकत नाही.

सदर दोन्ही कामे पूर्ण करुन नविन बस प्रत्यक्ष शहरातील रस्त्यांवर धावणेकामी केंद्रशासनाने कालमर्यादा दिली असून ती दि. ३१/१२/२००९ अशी आहे. व त्याबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी आढावा घेतला जात असल्याने कालमर्यादेत काम पूर्ण होणे आवश्यक आहे व त्यामुळे काम क्र. २ (५० चेसीज वर specifiacation नुसार Fabrication करुन बॉडी बांधणे) बाबत प्राप्त निविदाधारकांना समान प्रमाणात कामाचे वाटप केल्यास कालमर्यादेत काम पूर्ण होणे शक्य होईल.

काम क्र. १ मध्ये २ बाबत वरीलप्रमाणे निविदेतील दरास व त्याकामी होणाऱ्या खर्चास या अगोदर मा. स्थायी समिती सदस्यांनी लिखित मान्यता दिली आहे. वरील प्रमाणे प्रस्तावाचे अवलोकन करुन मंजूरी देण्यात येत आहे.

**मा. सभापती :-**

ठराव वाचून कायम करण्यांत येत आहे. सचिव साहेब, पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ८६ :-**

केंद्रशासनाच्या (JNNURM) योजने अंतर्गत ५० बस चेसीज खरेदी करुन त्यावर बॉडी बिल्डींग करण्याच्या दोन स्वतंत्र कामाच्या निविदांना मंजूरी देणेबाबत. (दि. ०९/१२/२००९ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७७)

**ठराव क्र. ७६ :-**

केंद्रशासनाच्या (JNNURM) योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरातील परिवहन सेवेकरीता ५० बस खरेदी करण्याचे आयोजन केलेले आहे व त्या अनुषंगाने मनपाने दि. २०/०८/२००९ च्या **"महाराष्ट्र टाईम्स"**, **"लोकमत"** व **"इकॉनॉमिक टाईम्स"** या दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दी करुन Technical specifiacation नुसार १) ५० बस चेसीज पुरवठा करणे व २) प्राप्त चेसीजवर Technical specifiacation प्रमाणे फॅब्रीकेशन करुन बॉडी बांधून देणेच्या कामांकरीता स्वतंत्र्य निविदा मागवण्यात आल्या होत्या. तद्अनुषंगाने खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

**क्रमांक १ :- ५० बस चेसीज पुरवठा करणे.**

| अ.क्र. | कामाचा तपशिल | निविदाधारकाचे नाव देकाराची रक्कम | |
|---|---|---|---|
| | | मे. टाटा मोटर्स | मे. अशोक लेलॅन्ड |
| १. | Technical specifiacation प्रमाणे ५० बसच्या चेसीज पुरवठा करणे. | रु. १२,८७,५७६/- | रु. १३,३५,२९६/- |

वरील निविदाधारक हे थेट उत्पादक असून त्यांनी निविदेत नमूद केलेले दर हे **"शासकीस दर"** नुसार आहेत व निविदेतील दरात वाटाघाटी करणे संयुक्तिक राहणार नाही.

**क्रमांक १ :- ५० बस चेसीजवर बॉडी बिल्डींग करणे.**

| अ.क्र. | कामाचा तपशिल | मे. आरको इंजिनिअर्स | | मे. अॅन्थोनी गॅरेज प्रा. लि. | |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | Technical specifiacation प्रमाणे ५० बस चेसीजवर Fabrication करुन बॉडी बिल्डींग बांधणे | रु. ७,१६,२००/- | रु. ६,९०,०००/- | रु. ७,१५,०००/- | रु. ६,९०,०००/- |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | मे. आरको इंजिनिअर्स | | मे. अॅन्थोनी गॅरेज प्रा. लि. | |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | Technical specifiacation प्रमाणे ५० बस चेसीजवर Fabrication करुन बॉडी बिल्डींग बांधणे | रु. ७,१५,७२०/- | रु. ६,९०,०००/- | रु. ७,१५,०००/- | रु. ६,९०,०००/- |

उक्त कामाच्या निविदेतील दराबाबत वाटाघाटी करुन ते कमी केले आहेत. वाटाघाटी नंतर निश्चित केलेल्या दरामुळे महानगरपालिकेचे रु. १२,८२,६४०/- इतके वाचणार आहेत. सदर कामाच्या वाटाघाटीनंतर निश्चित केलेले दर मान्य असलेबाबत निविदाधारकांनी मनपास लेखी कळविले आहे.

काम क्र. १ मध्ये प्राप्त झालेल्या निविदांमध्ये **"मे. टाटा मोटर्स"** यांचा दर सर्वात कमी असून केंद्रशासनाने अपेक्षीत केलेल्या किंमतीपेक्षा कमी असून वाजवी आहे. चेसीजच्या गुणवत्तेबाबत मे. टाटा मोटर्स यांचेकडून लेखी हमीपत्र घेवून निविदेतील Technical specifiacation प्रमाणे ५० बस चेसीज पुरवठा करणेच्या कामाबाबत **"मे. टाटा मोटर्स"**यांची निविदा मान्य करणेस हरकत नाही.

काम क्र. २ मध्ये प्राप्त झालेल्या निविदांमधील दरात वाटाघाटी करुन निश्चित केलेल्या दरात काम समान प्रमाणात चारही निविदाधारकांना देणेस हरकत नाही.

सदर दोन्ही कामे पूर्ण करुन नविन बस प्रत्यक्ष शहरातील रस्त्यांवर धावणेकामी केंद्रशासनाने कालमर्यादा दिली असून ती दि. ३१/१२/२००९ अशी आहे. व त्याबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी आढावा घेतला जात असल्याने कालमर्यादेत काम पूर्ण होणे आवश्यक आहे व त्यामुळे काम क्र. २ (५० चेसीज वर specifiacation नुसार Fabrication करुन बॉडी बांधणे) बाबत प्राप्त निविदाधारकांना समान प्रमाणात कामाचे वाटप केल्यास कालमर्यादेत काम पूर्ण होणे शक्य होईल.

काम क्र. १ मध्ये २ बाबत वरीलप्रमाणे निविदेतील दरास व त्याकामी होणाऱ्या खर्चास या अगोदर मा. स्थायी समिती सदस्यांनी लिखित मान्यता दिली आहे. वरील प्रमाणे प्रस्तावाचे अवलोकन करुन मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८७, "मे. श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड" या संस्थेला जकात माफी मिळणे बाबत.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदरमध्ये इतर संस्था किती आहेत? ही एकच संस्था आहे का? ज्यांना आपण एवढी जकात माफी दयावी.? प्रशासनाने हा विषय आणायचे कारण काय?

**बर्नट डिमेलो :-**

साहेब, मग मच्छीमारी संस्था येतील. त्यापण संस्था आहेत. त्याला लागणारी इंजिन आणि लाकडे....

**मा. आयुक्त :-**

तुम्ही विश्लेषण करता, गावात प्रोडक्शन करणारे.

**बर्नट डिमेलो :-**

आत्ता मासेमारी गावात प्रोडेक्शन होते.

**मा. आयुक्त :-**

गावात प्रोडक्शन होणार त्यावर आम्ही तुमच्याकडून ऑक्ट्रॉय कुठे घेतो.?

**अनिल सावंत :-**

काय नाही घेत? रॉ मटेरियल येते त्याच्यावर तुम्ही ऑक्ट्रॉय घेत नाही?

**मा. आयुक्त :-**

तुम्ही नावे सांगा.

**अनिल सावंत :-**

घरगुती शिलाई काम करणाऱ्या २५ बायका आहेत. मी तुम्हाला दाखवतो. त्यांना उदया तुमच्याकडे पाठवतो. त्या जे मटेरियल घेऊन येतात. त्याच्यावर त्या रेल्वे स्टेशनवर उतरल्यानंतर...

**मा. आयुक्त :-**

मी मंजुरीचा रेट घ्यायला लावलेले आहे.

**अनिल सावंत :-**

मटेरिअलवर ऑक्ट्रॉय घेतात.

**मा. आयुक्त :-**

मी स्वतः ऑक्ट्रॉयवाल्यांची त्या लेडीज समोर मिटींग घेतली आहे. आणि मंजूरीवर घ्या. म्हणून सांगितले. अंदर के अंदर करके बेच रहे है. उनके उपर ऑक्ट्रॉय नही है।

**अनिल सावंत :-**

साहेब, बाहेरून रॉ मटेरियल येते. त्याच्यावर ऑक्ट्रॉय घेतात. जर कोणी १० ड्रेस नवीन आणले तर त्याच्यावरसुध्दा रेल्वे स्टेशनला घेतात.

**मा. आयुक्त :-**

महाराष्ट्रामध्ये या संस्थेला सगळ्यांनी सुट दिली आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

मग सगळ्या संस्थांचा विचार करावा लागेल. दुसऱ्याला पण संस्था आमच्याकडे येतात.

**अनिल सावंत :-**

या संस्थेमध्ये मिरा भाईंदरच्या किती महिला काम करतात?

**मा. आयुक्त :-**

ते तीन महिन्यांसाठी आहे.

**अनिल सावंत :-**

ऑक्ट्रॉय जात नाही. जर ऑक्ट्रॉय राहिला तर पुढच्या वर्षासाठी विचार करू.

**चंद्रकांत मोदी :-**

१ तारीख को ऑक्ट्रॉय जा रहा है।

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, आपण जर लिज्जत पापडवर सवलत देतो तर किती फरक पडेल? महानगरपालिकेला किती नुकसान होईल?

**मा. आयुक्त :-**

महिन्याला २५ हजार. प्रोव्हीजन केलेले आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८८, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दुसऱ्या टप्प्यामधील विविध ठिकाणी ९ ग्रुप (९० होर्डिंग्ज) ठेका होर्डिंग्जच्या मासिक मुल्याधिकारीक (Offset Value) दराबाबत फेरविचार करणेबाबत.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये आम्ही जो विषय आणलेला आहे. तो टेंडरचा हायेस्ट दर आला होता, चार हजार रूपये धरून. म्हणून मा. स्थायी समितीने ठराव केला होता की, एका होर्डींगची किंमत चार हजार रूपये धरूनच टेंडर काढा. त्यामुळे कमीत कमी पाच ते सहा वेळा आम्ही टेंडर काढले. एकही टेंडर आलेले नाही. म्हणून आम्ही ती व्हॅल्यु कमी करा म्हणून तुमच्यापुढे विषय आणला होता. व्हॅल्यु न लिहिता पण टेंडर काढता येते किंवा तीन हजार धरून. काय धरून टेंडर काढायचे होते यासाठी आला होता. या निर्णयामुळे महापालिकेचे दररोज नुकसान होते. परंतु हा विषय दिल्यानंतर काल आमच्याकडे दोन पत्रं आली आहेत की, टेंडर न देता आम्ही चार हजाराने घ्यायला तयार आहोत. सरस्वती ॲडर्व्हटायजींग सर्विसेस. म्हणजे पाच वेळा टेंडर काढूनही आले नाही. महिना निहाय रक्कम स्विकारावी. १० टक्के गॅरेंटी स्विकारावी. करारनामा ५ + २ = ७ वर्षाकरिता करावा. होर्डींग उभारल्या दिनांकापासून फी आकारावी. जागा बदलण्याचा प्रस्ताव मान्य करावा. ९० होर्डींगचे काम लवकरात लवकर, ब्रीजखालील जागा काही कालावधीकरिता दयावी. होणारे भाडे आम्ही भरण्यास तयार आहेत. या अटी त्यांनी घातलेल्या आहेत. आणि दुसरा अर्ज आलेला आहे, उमराव इन्स्टीट्युट ऑफ सायन्स ॲन्ड रिसर्च या संस्थेचा. त्यांना चार हजार या दराने आठ पाहिजे आहेत.

**अनिल सावंत :-**

प्रॉब्लेम असा आहे की, लोक चार हजार रूपयांनी घ्यायला तयार आहेत. परंतु हे जे टेंडरींग सिस्टम आहे. इथे एवढी दादागिरी आहे की, लोकांना टेंडर टाकायलाच देत नाहीत.

**मा. आयुक्त :-**

आत्ता हायकोर्टाने ऑर्डर दिलेली आहे की, इटेंडरींग करायचे आत्ता प्रत्येक टेंडर जे येईल ते इटेंडरींग म्हणजे सगळीकडे फ्लॅश होईल आणि इथे दादागिरी चालते म्हणून आपण पोलिस बंदोबस्त मागितला आहे. आणि प्रभाग समितीमध्ये सुध्दा टेंडर टाकायला अलाउड केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

आपल्या महानगरपालिकेची वेबसाईट अजून कम्लीट कुठे झाली आहे.

**मा. आयुक्त :-**

होणार.

**जुबेर इनामदार :-**

त्यांना विचारा.

**मा. आयुक्त :-**

कुठपर्यंत आली?

**सिमा मिश्रा :-**

२०.

**जुबेर इनामदार :-**

मी उघडून बघितले. काहीच येत नाही. फक्त मिरा भाईंदर माहनगरपालिका येते.

**मा. आयुक्त :-**

सुरू झाल्यानंतर बघा. सुरू होण्यापूर्वी बघून काय इपयोग आहे.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, कधीपर्यंत होईल?

**मा. आयुक्त :-**

किती दिवस लागतील?

**सिमा मिश्रा :-**

२० दिवस.

**मा. आयुक्त :-**

२० दिवस कशाला लागतील?

**सिमा मिश्रा :-**

वेबसाईट साठी.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)):-**

वेबसाईट साठी डोनेम रजिस्टर मागच्या वर्षीच झाले. तथापी, वेबसाईटसाठी जी बेसीक माहिती आहे, फॉरमॅटसाठी ही आत्ता आपण सर्व डिपार्टमेंटकडून मागवतो.

**अनिल सावंत :-**

आपण जगाच्या मागे आहोत.

**ग्रिटा फॅरो :-**

साहेब, जर ऑक्ट्रॉयच बंद होत आहे. मग हा विषय आणून १५ दिवसांसाठी उगाच कशाला?

**जुबेर इनामदार :-**

ठेकेदार बेअर करणार आहे.?

**अनिता पाटील :-**

"मे. श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड" ही महिलांची महिलांद्वारे चालवली जाणारी संस्था असून संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांच्या शाखा आहेत. सदर संस्थेचा कारखाना महानगरपालिका क्षेत्रात गौतम कॉम्प्लेक्स, प्रसाद हॉटेल समोर, द्रुतगती महामार्ग, पोस्ट मिरा, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे येथे आहे. या संस्थेची उत्पादने पापड, मसाला, साबण वड्या, डिटर्जन पावडर इत्यादी स्वरुपाची आहेत. यासर्व उत्पादनास "खादी व ग्रामोद्योग आयोग" या कार्यालयाने ग्रामोद्योग उत्पादने म्हणून मान्यता दिलेली आहे.

"महाराष्ट्र नगरपालिका जकात नियम १९६८" अनुसूची २ मधील १६ (ड) प्रमाणे ग्रामोद्योग कमिशनने प्रमाणित केलेल्या वस्तुंना नियम ४ अन्वये जकात कर माफी देता येउ शकते. सदर संस्थेच्या उत्पादनास बृहंमुंबई महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, डोंबिवली निजामपूर शहर महापालिका या कार्यालयाकडून जकात माफी मिळालेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि. १९/०३/२००९ ते ३१/०३/२०१० पर्यंत जकात कर वसुलीचा ठेका जकात अभिकर्ता मे. कोणार्क इन्फ्रा. लि., यांना देण्यात आला आहे. वरील प्रमाणे नमुद केलेल्या नियमांच्या अटीशर्तींच्या अधीन राहून तसेच जकात अभिकर्ता यांच्याशी जकात कर वसुलीच्या करारनाम्यातील तरतुद पहाता "महाराष्ट्र नगरपालिका जकात नियम १९६८" अनुसूची २ मधील १६ (ड) प्रमाणे मे. श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड, यांना खादी ग्रामोद्योग आयोगाने प्रमाणित केलेल्या कच्च्या व पक्क्या मालास ही सभा जकात कर माफी देत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव वाचून कायम करण्यात येत आहे. सचिव साहेब, आपण पुढील विषयाला सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. ८७ :-**

"मे. श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड" या संस्थेला जकात माफी मिळणे बाबत.

**ठराव क्र. ७७ :-**

"मे. श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड" ही महिलांची महिलांद्वारे चालवली जाणारी संस्था असून संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांच्या शाखा आहेत. सदर संस्थेचा कारखाना महानगरपालिका क्षेत्रात गौतम कॉम्प्लेक्स, प्रसाद हॉटेल समोर, द्रुतगती महामार्ग, पोस्ट मिरा, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे येथे आहे. या संस्थेची उत्पादने पापड, मसाला, साबण वड्या, डिटर्जन पावडर इत्यादी स्वरुपाची आहेत. यासर्व उत्पादनास "खादी व ग्रामोद्योग आयोग" या कार्यालयाने ग्रामोद्योग उत्पादने म्हणून मान्यता दिलेली आहे.

"महाराष्ट्र नगरपालिका जकात नियम १९६८" अनुसूची २ मधील १६ (ड) प्रमाणे ग्रामोद्योग कमिशनने प्रमाणित केलेल्या वस्तुंना नियम ४ अन्वये जकात कर माफी देता येउ शकते. सदर संस्थेच्या उत्पादनास बृहंमुंबई महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, डोंबिवली निजामपूर शहर महापालिका या कार्यालयाकडून जकात माफी मिळालेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि. १९/०३/२००९ ते ३१/०३/२०१० पर्यंत जकात कर वसुलीचा ठेका जकात अभिकर्ता मे. कोणार्क इन्फ्रा. लि., यांना देण्यात आला आहे. वरील प्रमाणे नमुद केलेल्या नियमांच्या अटीशर्तींच्या अधीन राहून तसेच जकात अभिकर्ता यांच्याशी जकात कर वसुलीच्या करारनाम्यातील तरतुद पहाता "महाराष्ट्र नगरपालिका जकात नियम १९६८" अनुसूची २ मधील १६ (ड) प्रमाणे मे. श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड, यांना खादी ग्रामोद्योग आयोगाने प्रमाणित केलेल्या कच्च्या व पक्क्या मालास ही सभा जकात कर माफी देत आहे.

**सुचक :- श्रीम. अनिता पाटील** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)):-**

त्याची कल्पना आहे.

**अनिल सावंत :-**

अडीज वर्षापासून कम्प्युटरायझेशन करा म्हणून फॉलो अप करतो आहे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)सो. :-**

कम्प्युटरायझेशनला जी आवश्यक बेसीक इन्फॉर्मेशन असेल. आत्ता जेएनएनयुआरएम अंतर्गत आणि माहितीच्या अधिकार अधिनियमचा कलम ४ आहे. त्याप्रमाणे जेएनएनयुआरएमच्या अटीमध्ये पब्लीक डिस्क्लोजर नावाचे एक क्लॉज आहे. जो आपल्याला कम्प्लायन्स करायचा आहे.

**अनिल सावंत :-**

जेएनएनयुआरएम तर आत्ता आले. एक वर्ष झाले. त्याच्यापूर्वी व्हायला पाहिजे होते.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)सो. :-**

जेएनएनयुआरएम, नोव्हेंबर २००५ पासून ......

**अनिल सावंत :-**

अजून काही ठिकाणी आपली बिले मॅन्युअलीच जात आहेत. रसिट मॅन्युअली फाडल्या जात आहेत.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)सो. :-**

आत्ता आपण ही बेसिक इन्फॉर्मेशन मागवली आहे. ती मागवल्यानंतर ऑलरेडी आपण त्याचे कोटेशन मागवलेले आहे. कोटेशन फायनलाईज झाले की, साधारणतः मॅक्सीमम एक महिना लागेल. कारण त्याला दोनच गोष्टी आहेत. गव्हर्नमेंट रजिस्ट्रेशन झालेले आहे. आत्ता आपल्याला फक्त वेबसाईट बुक करावी लागेल. तूर्तास आपण स्टॅटीक वेबसाईट करतो आणि नंतर जशी जशी कॉर्पोरेशनची रिक्वायरमेंट आहे, त्या रिक्वायरमेंटप्रमाणे आपण डायनॉमिक वेबसाईट बुक करणार. आणि तद्नंतर ती वेबसाईट रेग्युलर लॉंच होईल. आणि ती वेबसाईट लॉंच करताना अर्थातच समारंभ होईल. इट कॅन नॉट बी जस्ट लंच लाईक दॅट.

**अनिल सावंत :-**

मॅडम, ते मिरा गांवमध्ये अजून मॅन्यूअलीच आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही पुढे होते हे आम्ही वर्तमानपत्रातून पाहिले होते. महाराष्ट्र टाईम्सला अर्धा-अर्धा पान आले होते. परंतु इथे झाल्यानंतर ते चालू नाही हे आम्हाला दिसले.

**अनिल सावंत :-**

मॅडम, मिरा गावामध्ये अजून मॅन्यूअलीच बनत आहेत. तुम्ही मागच्या वेळेस सांगितलेले.

**मा. आयुक्त :-**

तुमचे जे आहे. ज्या सगळ्या परवानग्या दयायच्या होत्या त्या महाराष्ट्र टाईम्सला अर्धा-अर्धा पान मी भिवंडीला असताना वाचलेले होते. परंतु, प्रत्यक्षात पेपरमध्ये आले त्याप्रमाणे काहीच नव्हते.

**अनिल सावंत :-**

मॅडम, मिरा गावमध्ये मॅन्युअली बिल बनवतात, रसीट फाडतात ते कम्प्युटरायझेशन कधी होणार?

**सिमा मिश्रा :-**

आम्ही सर्वे केलेला आहे.

**अनिल सावंत :-**

अजूनपर्यंत सर्व्हेच चाललेला आहे.

**सिमा मिश्रा :-**

सर्व्हे केलेला आहे. साहेबांनी टेंडर काढायला मान्यता दिलेली आहे.

**अनिल सावंत :-**

मग तशी कामे लवकर घ्या. कम्प्युटराईज बिले आणि रसीट आपल्याला कधी मिळणार ते फक्त सांगा.

**सिमा मिश्रा :-**

८ ते १० दिवस लागतील.

**अनिल सावंत :-**

प्रकरण क्र. ८८, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ९० होर्डिंगकरीता पाच वेळा निवीदा मागवून देखील .......

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, त्यांना ५ वर्षाची ७ वर्षाची मुदत करून दयायची आहे?

**मा. आयुक्त :-**

कमी करा.

**शरद पाटील :-**

आपले जे होर्डींग लागले आहेत. त्याची निशाणी काय आहे आणि रस्त्याला ट्राफीकला अडथळा येत असेल अशा ठिकाणी ते होर्डींग देऊ नये.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, आत्ता होर्डींगचा विषय आहे. त्याच्यावर काही गोष्टी बोलायच्या आहेत. आपण बघतो. होर्डींग आपण पाहिजे तशी सर्वांना संमती, परवानगी देतो. पण काही इमारतींसमोरपण होर्डींग लावलेल्या असतात. काही गार्डन आहेत. गार्डनच्या समोर मोठ्या प्रमाणात लावतात. त्याच्यामुळे सोसायटीमध्ये जे लोक राहतात. त्यांनी फ्लॅट घेतलेला असतो. त्या उद्देशाने घेतलेला असतो की, त्यांना मोकळी हवा यावी. पण हे होर्डींग लावल्यामुळे त्यांची हवाच बंद झालेली आहे. तर अशा ठिकाणी, जे सोसायटीचे आवार आहे किंवा इतर ठिकाणी जी लोकवस्ती आहे. त्या ठिकाणी जवळपास होर्डींग लावायला देऊ नये. जिथे मोकळी जागा आहे तिथे....

**मा. आयुक्त :-**

सोसायटीवाले संमती देवून भाडे घेतात. त्यामुळे त्यांना हवेची काळजी आहे की नाही हे त्यांनी ठरवायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, माझा विषय असा आहे की, जिथे ट्राफीकला अडथळा होतो. आणि जिथून वाहने जातात ते दिसत नाही. अशा ठिकाणी आपण देवू नये. अशी माझी सुचना आहे. त्याच्यात ॲड करून घ्या.

**मा. आयुक्त :-**

सर्व पदाधिकाऱ्यांनीपण याचे डोक्यात ठेवावे. आम्हाला आपण ज्या सजेशन्स करणार आहोत. त्या सजेशन सर्व पार्टी लिडरनी, आणि पदाधिकाऱ्यांनीपण लक्षात ठेवणे ही माझी विनंती आहे.

**शरद पाटील :-**

तशा जागी असतील ते कटआउट काढून घ्यायचे.

**मा. आयुक्त :-**

असा ठरावच करून घ्या.

**मा. सभापती :-**

कुठे आपल्या लक्षात आले आहे? श्री. म्हात्रे साहेब, अशा सोसायटीची तक्रार असेल, कुठे अडचण असेल अशा ठिकाणी कट आऊट वगैरे नको. या ठिकाणी अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन सोय करावी.

**मा. आयुक्त :-**

साहेब हीच पंचाइत असते. आम्ही कुठे बोर्ड लावलेले नाहीत. आमच्या कार्यकर्त्यांनी लावला. म्हणजे सर्व पार्टीच्या पदाधिकारी आणि नेते मंडळींनी सुध्दा आम्हाला ज्या सजेशन्स करता ते तुम्हीपण पाळावे अशी आमची विनंती आहे.

**मा. सभापती :-**

निश्चितपणे पालन होईल.

**मा. आयुक्त :-**

विकण्यासाठी प्रसिध्दीकरण करतात.

**शरद पाटील :-**

प्रसिध्दीकरण करा. त्यांचे म्हणणे ते नाही. पण तिथे वाहतुकीला ट्रॅफीकला अडथळा होतो. अशी जागी नका करू.

**मा. आयुक्त :-**

ठराव करून घ्या.

**शरद पाटील :-**

सार्वजनिक बांधकामाचे इंजिनिअर आहेत. त्यांनी याच्यावर त्यांचे मत मांडावे.

**मा. आयुक्त :-**

कोणालाही न विचारता ते काढून टाकावे आणि कोणी अडथळा करत असतील तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा.

**शरद पाटील :-**

सार्वजनिक बांधकाम इंजिनिअरला विचारा की, त्यांचे मत काय आहे?

**दिपक खांबीत :-**

साहेब, ठाण्याला ऑर्डर झाल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

ठाण्याला हायकोर्टाची ऑर्डर झाली...

**अनिल सावंत :-**

ते मुंबईला झाले आहे.

**मा. आयुक्त :-**

त्याचे पालन आपल्याकडूनपण होणे गरजेचे आहे, आमच्या कार्यकर्त्यांनी लावले म्हणून वेगळे बसून चालणार नाही. कोणोकोणाचे फोटो आहेत. ते ही जबाबदार आहेत. त्यामध्ये आम्ही आत्ता असा बदल केला आहे की, ज्या दिवशी ॲडव्हर्टाइजचे फी भरून बोर्ड लावायला परवानगी घेतली. ती किती दिवसासाठी घेतली? म्हणजे बोर्ड किती तारखेला लावले आणि काढायची तारीख किती ते त्या बोर्डावरच आले पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, चांगली भुमिका आहे. पण ते राबवले पाहिजे ना. आज वाढदिवस असला तर पुढच्या वाढदिवसापर्यंत तो बोर्ड तिथेच असतो.

**मा. आयुक्त :-**

बोर्डवर तारीख असेल तरच ठेवणार. तारीख नसेल तर काढून टाकणार. कोणाचा विचार करणार नाही की, परवानगी दिली की, नाही दिली. इकडे ॲडव्हर्टाइजची डेट आणि काढल्याची डेट उजव्या बाजूला आलीच पाहिजे. म्हणजे तुमचे तुम्ही काढून घ्या. नाहीतर आम्ही काढणार.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, तारीख असूनसुध्दा बॅनर काढत नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब लोकांचे श्रध्दांजलीचे जे बोर्ड आहेत ते फाटले. तरी काढत नाहीत.

**शरद पाटील :-**

श्री. कुरेशी साहेब, तुमचे मत बरोबर आहे. हे ठराविक लोकांचेच बोर्ड काढतात. जे कधीच लावत नाहीत. आणि पहिल्या दिवशी लावले की, त्याच्या दुसऱ्या दिवशी काढायचा.

**मा. सभापती :-**

कमिशनर साहेब, माझे ज्या रात्री लागले, दुसऱ्या दिवशी दुपारी तीन ठिकाणचे होर्डींग काढले.

**मा. आयुक्त :-**

तुमचे एकूण बोर्ड किती लागले आहेत ती संख्या सांगा.

**मा. सभापती :-**

माझे ३-४ बोर्ड दुसऱ्या दिवशी काढले.

**मा. आयुक्त :-**

टोटल किती लागले ते सांगा.

**मा. सभापती :-**

आपण केव्हा-केव्हा बघतो एखाद्याचे होर्डींग एक महिना दोन महिने तिकडे असतात.

**अनिल सावंत :-**

हा आमचा मा. स्थायी समिती सदस्य आणि मा. सभापतींचा अपमान आहे.

**जुबेर इनामदार :-**

लाईट पोलवर जेवढे लागले आहेत.....

**अनिल सावंत :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ५ मध्ये हे प्रोव्हीजन आहे. मा. स्थायी समितीला तो अधिकार आहे. मा. स्थायी समितीला त्यात्या कार्यवृत्तात कारणे नमुद करून मा. आयुक्तांस यात तरतुद केल्याप्रमाणे निविदा न मागविता किंवा मागविल्यानंतर त्यांच्याकडे ज्या कोणत्या निविदा येतील त्या न स्विकारता संविदा करण्यास प्राधिकृत करता येईल.

**मा. आयुक्त :-**

५-६ वेळा टेंडर काढूनही आलेले नाही म्हणून आलेला जो दर आहे तो एक्सेप्ट करायचा.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ९० होर्डीग्ज करीता पाच वेळा निविदा मागवून देखिल प्रतिसाद न लाभल्याने प्रशासनाने मासिक मुल्याधिकारीक (offset value) दराबाबत फेरविचार करण्यासाठी प्रकरण ठेवले आहे. तथापी दि. १६/१२/२००९ रोजी मे. सरस्वती एडव्हार्टायजिंग सर्व्हीस व मे. द उमराव इंस्टीट्युट ऑफ सायन्स ॲण्ड रिसर्च यांनी महानगरपालिकेच्या मासिक मुल्याधिकारीक (offset value) दरानुसार होर्डीग्ज भाड्याने घेण्याकरीता तयारी दर्शविलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण पाच (दोन) (दोन) अन्वये मा. स्थायी समितीस प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर होर्डीग्ज मे. सरस्वती एडव्हार्टायजिंग सर्व्हीस यांच्या दि. १६/१२/२००९ च्या पत्रात नमुद केलेल्या अटीशर्ती नुसार व मे. द उमराव इंस्टीट्युट ऑफ सायन्स ॲण्ड रिसर्च यांच्या दि. १७/१२/२००९ रोजीच्या पत्रानुसार नमुद केलेल्या अटीशर्ती बाबत तडजोड करुन महानगरपालिकेच्या हिताचा विचार करुन करारनामा करुन भाड्याने देण्याचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देण्यात येत आहेत.

**जुबेर इनामदार :-**

याच्यामध्ये माझी सुचना आहे. किती वर्षाकरिता देता ते महत्वाचे आहे. आणि दरवर्षी त्याच्यामध्ये भाडेवाढ हा एक मुद्दा असायला पाहिजे. १० टक्के भाडेवाढ प्रत्येक वर्षी असायला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

आपण ते अधिकार मा. आयुक्तांना देत आहोत. याच्यामध्ये प्रोव्हीजन कसे आहे की, मा. स्थायी समिती मा. आयुक्तांना अधिकार देऊ शकते. फायनल करू शकत नाही. मा. आयुक्त नंतर ते फायनल करणार.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्तांना अधिकार दया. त्याच्यामध्ये सुचना समाविष्ट करा. मा. आयुक्तांनी निर्णय घेताना या बाबीचे लक्ष ठेवावे की, प्रत्येक वर्षी १० टक्के भाडेवाढ करावी.

**मा. सभापती :-**

ठराव वाचून सुचनेसह कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दुसऱ्या टप्प्यामधील विविध ठिकाणी ९ ग्रुप (९० होर्डिग्ज) ठेका होर्डिग्जच्या मासिक मुल्याधिकारीक (Offset Value) दराबाबत फेरविचार करणेबाबत.

**ठराव क्र. ७८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ९० होर्डीग्ज करीता पाच वेळा निविदा मागवून देखिल प्रतिसाद न लाभल्याने प्रशासनाने मासिक मुल्याधिकारीक (offset value) दराबाबत फेरविचार करण्यासाठी प्रकरण ठेवले आहे. तथापी दि. १६/१२/२००९ रोजी मे. सरस्वती एडव्हार्टायजिंग सर्व्हीस व मे. द उमराव इंस्टीट्युट ऑफ सायन्स ॲण्ड रिसर्च यांनी महानगरपालिकेच्या मासिक मुल्याधिकारीक (offset value) दरानुसार होर्डीग्ज भाड्याने घेण्याकरीता तयारी दर्शविलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण पाच (दोन) (दोन) अन्वये मा. स्थायी समितीस प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर होर्डीग्ज मे. सरस्वती एडव्हार्टायजिंग सर्व्हीस यांच्या दि. १६/१२/२००९ च्या पत्रात नमुद केलेल्या अटीशर्ती नुसार व मे. द उमराव इंस्टीट्युट ऑफ सायन्स ॲण्ड रिसर्च यांच्या दि. १७/१२/२००९ रोजीच्या पत्रानुसार नमुद केलेल्या अटीशर्ती बाबत तडजोड करुन महानगरपालिकेच्या हिताचा विचार करुन करारनामा करुन भाड्याने देण्याचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. याकुब करेशी**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

ह्यामध्ये प्रत्येक वर्षी १० टक्के भाडेवाढ करावी अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८९, महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातील राबविण्यात येणाऱ्या पल्स पोलिओ मोहिमेकरिता स्वयंसेवक मानधन वाढवून देणेबाबत व पल्स पोलिओ मोहिम लेखाशिर्षाच्या पूर्नविनियोजनास मान्यता देणेबाबत.

**मा. आयुक्त :-**

पहिल्या वेळेला एकदम ५ रूपयांवरून ५० रूपयांवर न जाता....

**अनिल सावंत :-**

इतर महानगरपालिकांमध्ये २०० रूपये आहेत.

**मा. आयुक्त :-**

पूर्वीपेक्षा आत्ता कॉन्ट्रॅक्ट बेसीस, सगळे धरून साडेतीन हजार कर्मचारी झाले आहेत.

**अनिल सावंत :-**

तिथे जरा कमी करा.

**मा. आयुक्त :-**

१६४१ ड्रायव्हर-४५, संगणक-८०, गार्डनमध्ये ५०.

**जुबेर इनामदार :-**

पल्स पोलिओवर किती आहेत? जे घरोघरी जाता फक्त त्यांना दया.

**मा. आयुक्त :-**

फक्त त्यांना दया. परंतु, गव्हर्नमेंट ९५ रूपये देते. तर तुम्ही पहिल्या वेळेला २०-२५ रूपये वाढवा. दुसऱ्या वेळेला परत वाढवा, असे करा.

**अनिता पाटील :-**

श्री. पानपट्टे साहेब, आपल्याकडे सगळ्या आरोग्य केंद्रात ज्या स्त्रिया लिंक वर्कर म्हणून काम करतात. त्यांना आपण किती देतो?

**मा. आयुक्त :-**

९५/- रूपये.

**अनिता पाटील :-**

साहेब, ते पल्स पोलिओचे झाले. लिंक वर्कर म्हणजे इतर स्त्रिया कामाला आहेत...

**मा. आयुक्त :-**

त्यांनापण देतो.

**ग्रिटा फॅरो :-**

त्यांना किती देतो.

**अनिता पाटील :-**

महिन्याचे ५००/- रूपये आहेत.

**मा. आयुक्त :-**

५००/- रूपये.

**ग्रिटा फॅरो :-**

पर मन्थ? मग साहेब, त्यांना रोजगार काय पडला? ५००/- रूपये महिन्याचे मग दिवसाचे किती पडले बघा. आणि त्यांच्या ड्युटी किती आहे.

**डॉ. चकोर :-**

लिंक वर्करला आपण प्रति महिना ५००/- रूपये देतो आणि त्यांना आपण पोलिओमध्ये कम्पलसरी काम देतो. त्याचे जवळ-जवळ ७००/- रूपये त्यांना मिळतात. त्या जेव्हा लसीकरणाला मदत करतात. तेव्हा प्रत्येक लसीकरणाच्या एक दिवसाच्या मदतीला ५०/- रूपये जवळ जवळ ४ लसीकरण त्या क्षेत्रात असतात.

**ग्रिटा फॅरो :-**

कारण त्या महिलांची कम्प्लेंट आहे. त्या सांगतात की, आम्हाला महिन्याकाठी फक्त ५००/- रूपये देतात.

**अनिता पाटील :-**

साहेब ह्याच लिंक वर्करला बृहन्मुंबईमध्ये, इतर नगरपालिकेत दोन ते अडीज हजार रूपये आहेत. आपल्याकडे तेवढे नको पण निदान थोडे तरी वाढवून मिळावे अशी त्यांची इच्छा आहे.

**मा. आयुक्त :-**

मॅडम मागच्या स्टॅंडींग कमिटीमध्ये चर्चा झाली की, त्यांचे राहणे एका ठिकाणी आणि जाणे एका ठिकाणी, लांब असते. म्हणून येण्याचे जाण्याचे म्हणून ते बॉम्बेमध्ये ॲड आहेत. इथे आपण त्याच एरियातील लोकांना घेतो.

**अनिता पाटील :-**

तरीसुध्दा साहेब, ५००/- रूपये म्हणजे त्यांना अगदीच....

**मा. आयुक्त :-**

१०००-१२०० पडतात. टोटल त्यांना १०००-१२०० मिळतात.

**अनिता पाटील :-**

ते तुमचे पल्स पोलिओ, लसीकरण हे सगळे पकडून. पण यांचे हे काम महिनाभर असते.

**मा. आयुक्त :-**

महिनाभर नसते.

**अनिल सावंत :-**

साहेब, जसा महिला लिज्जत पापडवाल्या महिलांचा आपण सहानुभूतीपूर्वक विचार केला.....

**अनिता पाटील :-**

यापण महिलाच आहेत. यांचापण जरा विचार करावा.

**अनिल सावंत :-**

या पण महिलाच आहेत. या आपल्या शहरातील महिला आहेत. त्या लिज्जत पापडवाल्या बाहेरच्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

ते शासनाने पत्र दिलेले. महाराष्ट्रातील सगळ्या जकात नाक्यावर जकात आकारु नये स्त्रियांच्या उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी सगळ्या महापालिकेने ठराव केला आणि आपण शासनाचे पत्र आले की, जकात सूट दयावी म्हणून ॲग्रीमेंटमध्ये तरतुद आहे. म्हणजे त्यामध्ये महापालिकेचा काहीच लॉस नाही.

**अनिता पाटील :-**

या महिलांचासुध्दा सहानुभूतीने विचार करावा एवढे म्हणणे आहे. ५००/- रूपये अगदीच कमी आहेत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, खर्च किती वाढतो त्याची सभागृहाला माहिती दया.

**मा. आयुक्त :-**

१५/- रूपयांनी ७८ हजार ३१५ होतात. आत्ता आपण मला वाटते १३०/- केला. म्हणजे २५/- रूपयांनी वाढले. आपण १५/-रूपये वाढवा म्हणून सुचवले होते. जर २५/- वाढवले तर १२० होतात. पूर्वीचे ५/- आणि आत्ताचे २०/- असे २५/- केले तर १२०/- होतील. १२०/- म्हणजे १५/- रूपयांनी ७८ हजार ३१५. अजून १०/- रूपये वाढवून आणि त्या महिलांना २००/-करा. म्हणजे ५००/- आणि हे २००/- आणि त्यांचे पल्स पोलिओचे सेपरेट होईल. म्हणजे ते ७००-८०० रूपये आणि हे ७०० रूपये असे १४००-१५०० रूपये मिळतील.

**ग्रिटा फॅरो :-**

१५००/- पर्यंत तरी त्यांना मिळायला पाहिजेत.

**मा. आयुक्त :-**

आले ना गव्हर्नमेंटकडून त्यांना ५००/- रूपये मिळतात. आपण त्यांना २००/- घातले, महिनाभर काम करतात म्हणून. आणि पल्स पोलिओ दिवशी त्यांना इतर यांच्याप्रमाणे पैसे मिळतात.

**वर्षा भानुशाली :-**

पल्स पोलिओ प्रचार व प्रसार या शिर्षाखाली २००९-१० या अर्थसंकल्पीय वर्षाकरीता नमुना क्र. १० अन्वये पूर्नविनीयोजन करणेस व प्रत्येक पल्स पोलिओ मोहिमेत प्रति स्वयंसेवक प्रति दिन रु. ३०/- महानगरपालिका निधीतून मानधन देणे बाबत मा. स्थायी समिती मंजूरी देत आहे. तसेच Link work ह्यांना प्रतिमहा २००/- रु. वाढ करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**अनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सुचनेसह मंजुर. पुढील विषय घेण्यात यावा..

**प्रकरण क्र. ८९ :-**

महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातील राबविण्यात येणाऱ्या पल्स पोलिओ मोहिमेकरिता स्वयंसेवक मानधन वाढवून देणेबाबत व पल्स पोलिओ मोहिम लेखाशिर्षाच्या पूर्नविनियोजनास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. ७९ :-**

पल्स पोलिओ प्रचार व प्रसार या शिर्षाखाली २००९-१० या अर्थसंकल्पीय वर्षाकरीता नमुना क्र. १० अन्वये पूर्नविनीयोजन करणेस व प्रत्येक पल्स पोलिओ मोहिमेत प्रति स्वयंसेवक प्रति दिन रु. ३०/- महानगरपालिका निधीतून मानधन देणे बाबत मा. स्थायी समिती मंजूरी देत आहे. तसेच Link work ह्यांना प्रतिमहा २००/- रु. वाढ करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. वर्षा भानुशाली          अनुमोदक :- श्रीम. अनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९०, भाईंदर (पूर्व) विभगातील बाजार ठेक्याबाबत.

**अनिल सावंत :-**

या विषयाबाबत जरा प्रशासनाने भुमिका स्पष्ट करावी.

**मा. आयुक्त :-**

सविस्तर गोषवारा दिला आहे.

**शरद पाटील :-**

गोषवारा जरी सविस्तर दिला असला तरीही प्रशासनाने त्यांची भुमिका स्पष्ट करावी. आणि त्याच्यात दिलेले आहे की, फेरिवाला क्षेत्र आणि ना फेरिवाला क्षेत्र या दोन्ही जागेवरून उचलले गेलेले आहे. तर त्यांनी सांगावे की, कुठच्या ना फेरिवाला क्षेत्रातून उचलले, कोणत्या फेरिवाला क्षेत्रातून उचलेले आणि ज्या फेरिवाला

क्षेत्रातून उचलले तिथे तो ठेकेदार पैसे वसुल करत होता की, करत नव्हता याची माहिती दयावी. आपण गोषवाऱ्यात काय दिलेले आहे की, फेरिवाला क्षेत्र आणि ना-फेरिवाला क्षेत्र या दोन्ही क्षेत्रातून उचलले गेलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

वाहतुकीला अडथळा होतो म्हणून.

**शरद पाटील :-**

तर कोणत्या फेरिवाला क्षेत्रातून उचलले आणि कोणत्या ना-फेरिवाला क्षेत्रातून उचलले असा आम्हाला एरिया सांगा.

**विजय पाटील :-**

ना-फेरिवाला क्षेत्र, आपला बी.पी. रोड आहे, नवघर रोड आहे, रेल्वे समांतर रस्ता आहे. या ठिकाणी पूर्वीपासूनच फेरिवाले बसत आलेले आहेत. आणि ते फेरिवाले धरूनच याच्या अगोदरसुध्दा टेंडरची रक्कम ठरलेली आहे. जी देकार रक्कम ठरलेली आहे ती, पहिल्या पासून बी.पी. रोडलासुध्दा फेरिवाले बसतात, नवघर रोडला बसतात, आणि आपल्या रेल्वे समांतर रोडला बसतात. हे पाहूनच देकाराची रक्कम येत होती. आणि त्या फेरीवाला क्षेत्रामधून ठेकेदार वसुली करत होता.

**शरद पाटील :-**

या तीनच रस्त्यावरून उचलले आहेत?

**याकुब कुरेशी :-**

तुम्ही जेव्हा हे टेंडर काढले तेव्हा ठेकेदाराला माहिती दिली नव्हती का?

**विजय पाटील :-**

माहिती दिली होती.

**याकुब कुरेशी :-**

मग फरक कसा येतो?

**विजय पाटील :-**

आपल्याकडे याच्या आधी एवढी कारवाईची तिव्रता झाली नव्हती, जशी आत्ता झाली आहे.

**शरद पाटील :-**

श्री. पाटील साहेब, आम्हाला स्पष्ट सांगा, जे आत्ता ना फेरिवाला क्षेत्रामधून उचलेले. आपल्या ॲग्रीमेंटमध्ये त्यांना तिथे वसुली करायची परवानगी आपण दिली होती की नाही फक्त एवढे सांगा.

**विजय पाटील :-**

नव्हती दिलेली.

**मा. आयुक्त :-**

श्री. पाटील साहेबांनी सांगावे की, आत्तापर्यंत श्री. पाटील साहेबांच्या टेनअरमध्ये पाच-सहा ठेका संपला. त्यावेळेला ना-फेरिवाला क्षेत्र असताना देखील तिथे बसत होते, रक्कम वसुल करत होते. त्यांना प्रत्यक्ष अनुभव आहे. आम्ही तर ऑफीसमध्ये बसणार.

**शरद पाटील :-**

साहेब, आम्हाला काय अनुभव आहे तसा विषय नाही. विषय तो नाही.

**मा. आयुक्त :-**

विषयाच्या अनुषंगाने नको. पण बसत होते आणि वसुल करत होते की, नाही?

**शरद पाटील :-**

ते अधिकाऱ्यांचे काम होते की, तो करत होता त्याच्याकडून आपण वसुली करून घ्यायला पाहिजे होती. अधिकाऱ्यांनी महापालिकेचे ते पैसे जमा करायला पाहिजे होते.

**जुबेर इनामदार :-**

आपल्या नियमानुसार आपण हे करू शकतो का?

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब प्रशासनाच्या ठरावात तुम्हाला जो निर्णय घेता येईल तो घ्या. आम्हाला त्यांच्याबद्दल सहानुभूती आहे. आपण निर्णय घ्यावा.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला अधिकार असल्यामुळे तुमच्यापुढे विषय आणला आहे. तुम्ही काय करायचे ते बघा. परंतु, मा. सभापती साहेब, वस्तुस्थिती खरी आहे की, त्या रोडवर फेरिवाले बसत होते. पैसे वसुल केले जात होते. गेल्या ५-६ ठेक्यामध्ये जेवढे व्यापारी होते. त्यांच्याकडून पैसे वसुल करत होता. जरी तो ना-फेरिवाला असला तरी ते पैसे मिळणार असे समजूनच प्रत्येक ठेकेदाराने ठेका घेतलेला आहे. आणि आत्ता पोलिस आणि महापालिका यांच्यावर नागरिकसुध्दा त्या विषयी खुश आहेत. आणि रहदारीला अडथळा कमी झालेला आहे. आणि त्या विषयावर ज्या ठेकेदाराने तिथले पैसे मिळणार असे गृहीत धरून घेतला, तिथे आपण आत्ता गेले ३ महिने बसू देत नाही. तर कृपया याचा सहानुभूतीपूर्वक विचार होणे गरजेचे आहे.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, मी थोडे बोलू इच्छितो. माझ्या माहितीप्रमाणे या क्षेत्रामध्ये तुम्ही स्वतः जाऊन पाहणी केलेली आहे. मला असे समजले आहे. तर तुम्ही जे काही कॅल्क्युलेशन करून सांगाल, त्याप्रमाणे हे सभागृह मान्यता देईल.

**शरद पाटील :-**

जे तुमच्या नियमात बसते, ऑडीटरनी सांगावे, अधिकाऱ्यांनी सांगावे जे नियमात बसत असेल ते मंजुर करायला आमची काही हरकत नाही.

**विजय पाटील :-**

गोषवाऱ्यामध्ये अमाऊन्ट दिलेली आहे.

**शरद पाटील :-**

ते नियमाप्रमाणे आहे का? उदया जर ते ॲग्रीमेंट खोलून दाखवले. आणि आम्हाला वाचून दाखवले की, हे असे-असे ॲग्रीमेंट होते. तिथे वसुली करायचा हक्कच नव्हता, मग ते पैसे कसले माफ केले? मग त्याचा जबाबदार कोण?

**अनिल सावंत :-**

बीपीएमसी ॲक्ट मध्ये काय प्रोव्हीजन आहे?

**सुधा व्यास :-**

मा. आयुक्त साहब, १ करोड १५ लाख का ठेका है। वसुली नही होगी तो भुगतान कैसे होगा? श्री. पाटील साहब, इसमे थोड सहानुभूती से विचार किया जाए। वहापर क्रिटीकल पोझीशन,हो गया है। दिनमे ३२ हजार रु. देना है। और १५ हजार की वसुली हो रही है।१७ हजार रूपये का पर डे लॉस हे रहा है। तो १७३ दिन के हिसाब से उनका कम किया जाए।

**जुबेर इनामदार :-**

आज आपण सुट दिली. तर उदया त्याच ठिकाणी परत फेरिवाले बसायला लागले तर?

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये बसवले तर आम्ही सुट देणार नाही.

**शरद पाटील :-**

मॅडम हम इसको विरोध नही कर रहे है।

**सुधा व्यास :-**

विरोध नही लेकीन इसमे चर्चा इस ढंग से करे की, इसमे सच मे लोस हो रहा है।

**शरद पाटील :-**

हम साहब को बोल रहे है की, ऑडीटर या अधिकारीयोने बोलने का की, यह नियम से है। इसको कर दे। हम उसको मंजुरी दे देते है।

**मा. आयुक्त :-**

श्री. पाटील साहेब, तुम्ही मुद्दयाला बगल घेऊन उत्तर देणार. बसत होते, वसुल करत होते की नाही हे सांगा.

**बर्नट डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही सहानुभूतीपूर्वक बोलता है ठिक आहे. त्याला हरकत नाही, जर आमदनी कमी झाली असेल. मला एवढेच बोलायचे आहे, प्रशासनाने त्याचा अभ्यास करावा, नाहीतर पूर्व-पश्चिम जे काही ठेकेदार आहेत ते सर्व धावत येतील.

**मा. आयुक्त :-**

सगळ्यांना देणारच नाही. सगळ्यांना मोकळे केलेलेच नाही. कुठे-ना-कुठे बसतात, कुठे-ना-कुठे वसुली होते. परंतु हे लोक आम्ही अजिबात बसू देत नाही.

**जुबेर इनामदार :-**

याची काळजी पुढे घ्यावी लागेल. परत, त्या क्षेत्रातमध्ये.....

**मा. आयुक्त :-**

साहेब, सुट वर्षाच्या अखेरीला मिळणार आहे. आत्ता आम्ही नाहीच देणार. परंतु, ते बसले नाहीत तरच सुट मिळणार ना? आणि श्री. पाटील साहेबांनी खरे सांगितले की, ती वस्तुस्थिती समजेल.

**शरद पाटील :-**

आपल्या त्या बी.पी.रोड, नवघर रोड, केबीन रोड़ला ठेकेदार पैसे वसुल करत हेता, याच्यात कुठेही शंका नाही. पण त्याच्यात ॲक्च्युली तो अधिकारी दोषी आहे. त्या अधिकाऱ्यांवर पहिले कार्यवाही करा.

**मा. आयुक्त :-**

आत्ता बसतात का?

**शरद पाटील :-**

आत्ता बसत नाहीत.

**मा. सभापती :-**

कमिशनर साहेब, आपल्याकडे हा जो विषय आलेला आहे. याच्यामध्ये मी आपल्याला थोडीशी सुचना करतो. आज आम्ही बजेटमध्ये याची तरतुद केलेली. ऑडीटर साहेब, तुमच्यासाठी विषय आहे. आम्ही ह्याची बजेटमध्ये तरतुद केलेली. आज आपण ही याच्यामधून मायनस करतो आहे. तर याचे आपल्याला परत कुठल्या ठिकाणी काय करता येईल? आणि शासनाकडून हा जो विषय आलेला आहे. याच्यामध्ये आपण करू शकतो का? आम्हाला तुमच्याकडून थोडेसे मार्गदर्शन येऊ दया.

**शरद पाटील :-**

श्री. पाटील साहेब, ना फेरिवाला क्षेत्र कुठे आहे? ना-फेरिवाला क्षेत्रामधून कुठून कुठून उचलले ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

ऑडीटर उत्तर देतील.

**दादासाहेब पाटील (मुख्य लेखापरिक्षक) :-**

सन्मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो. आत्ता फेरिवाला आणि ना-फेरिवाला जे क्षेत्र आहे, जे टेंडर काढलेले होते, त्याच्या अटी आणि शर्ती मी वाचलेल्या नाहीत. पण अटी आणि शर्तीनुसार जर अटी आणि शर्तीचे उल्लंघन होऊन जर होत असेल, तर मग त्याला माफ करायला हरकत नाही. पण जर तो अटी आणि शर्तीमध्ये असेल आणि तसेच टेंडर असेल तर मग बदल करता येणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

ती तर स्पष्ट भुमिका प्रशासनाने गोषवाऱ्यामध्ये दर्शविलेलीच आहे की, याला अटीशर्तीच्या अधीन राहूनच करतो. ऑडीटर साहेब, तुमची भुमिका स्पष्ट ठेवा. तुम्ही गोषवारा वाचला नाही का?

**दादासाहेब पाटील :-**

गोषवारा वाचलेला आहे. पण ज्या मुळ अटी आणि शर्ती आहेत त्या वाचलेल्या नाहीत.

**अनिल सावंत :-**

श्री. पाटील साहेब, तुम्ही एक सांगा हे देऊ शकतो की नाही ?

**दादासाहेब पाटील :-**

देऊ शकतो.

**सुधा व्यास :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रत्येक वर्षी बाजार लिलाव करीत असते. या लिलावापासून महानगरपालिकेस ठोस असे उत्पन्न मिळत आलेले आहे. यासाठी एकुण चार बाजार लिलाव क्षेत्र महानगरपालिकेने तयार केलेली आहेत. १) भाईंदर (प.) विभाग २) मुर्धा ते चौक ३) भाईंदर (पू.) विभाग (शिवार गार्डन पर्यंत) ४) मिरारोड ते चेणा पर्यंतचा भाग.

मिरा भाईंदर क्षेत्रामधील भाईंदर (पू.) बाजार लिलाव विभागाकरीता दि. १६/०२/२००९ ते दि. १५/०२/२०१० पर्यंत १२ महिन्याच्या कालावधीसाठी बाजार फी वसूली करणे करीता गेल्या वर्षातील १२ महिन्याच्या वसूलीकरीता देकारावर १०% रक्कम वाढवुन म्हणजेच रु. १,०९,०६,५००/- या किंमती पुढे मे. आदिता इंटरप्रायजेस यांनी किमान देकाराच्या पुढे रु. १,१४,०५,०००/- ने बोली पुकारल्याने दि. १२/०२/०९ च्या आदेशाप्रमाणे त्यांना वरील मुदतीकरीता भाईंदर (पू.) विभागाचा बाजार वसूली ठेका त्यांना देण्यांत आलेला आहे.

दि. १६/०२/२००९ पासून मे. आदिता इंटरप्रायजेस यांनी बाजार फी वसूलीस सुरवात केलेली आहे. भाईंदर (पू.) बाजार फी लिलाव अटी-शर्ती २००९-१० नुसार एकुण ना-फेरीवाला क्षेत्र अनुक्रमे १ ते २४ व फेरीवाला क्षेत्र १ ते १० आहेत. बाजार वसूलीसाठी ठेकेदारांना नेमुन दिलेल्या क्षेत्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी फेरीवाले बसतात अशा ठिकाणी दैनंदिन बाजार फी वसूली करीत असतात. त्याचप्रमाणेच मे. आदिता इंटरप्रायजेस यांनी दि. १६/०२/२००९ ते दि. ०८/०९/२००९ पर्यंत वसूली केली असल्याचे दिसुन येत आहे.

दि. ०९/०९/२००९ पासून महानगरपालिकेचे विभागीय कार्यालय क्र. ०२ येथील अतिक्रमण विभागाकडुन व भाईंदर पोलिस स्टेशन यांचेकडुन फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्रामध्यें बसणाऱ्या फेरीवाल्यांवर सरसकट तीव्र स्वरुपाची कारवाई सतत आजपर्यंत चालू आहे. या कारवाई बाबत त्यांनी वेळोवेळी महानगरपालिकेस पत्रव्यवहार केलेला असून अशा प्रकारची कारवाई करु नये अशी विनंती केलेली आहे. ना-फेरीवाला क्षेत्राबरोबरच फेरीवाला क्षेत्र व जेथे ना-फेरवाला क्षेत्र नाही अशा ठिकाणीही भाईंदर (पू.) पोलिस स्टेशन यांचेकडुन निरंतर कारवाई होत असल्याने बाजार फी वसूलीवर परिणाम होउन नुकसान होत असल्याबाबत ठेकेदार मे. आदिता इंटरप्रायजेस यांनी महानगरपालिकेस कळविले आहे.

मे. आदिता इंटरप्रायजेस यांनी दि. २७/११/०९ व दि. ३०/११/०९ रोजी महानगरपालिकेस पत्र देउन प्रभाग कार्यालय व पोलिस विभागाकडुन होत असलेल्या कारवाईबाबत कळविलेले असून सदर कारवाईमुळे त्यांना दारारोज रु. २० ते २२ हजाराचे आर्थिक नुकसान सोसावे लागत असल्याचे नमुद केले आहे. मे. आदिता इंटरप्रायजेस यांना दररोज महानगरपालिकेकडे रु. ३१,२००/- प्रतीदिन हफ्ता भरावयाचा आहे. आतापर्यंत ठेकेदार यांनी एकुण बाजार हफ्त्यापैकी रु. ८२,५०,०००/- रक्कम भरलेली आहे.

वरील प्रमाणे दिलेली परीस्थीती लक्षात घेता बाजार ठेकेदारास आर्थिक नुकसान सोसावे लागलेले आहे. तरी प्रशासनाकडुन व पोलिस स्टेशन, भाईंदर (पू.) यांचेकडुन होत असलेल्या कारवाईचा विचार करता बाजार ठेकेदार यांना दि. ०९/०९/०९ ते दि. १५/०२/१० पर्यंत १७३ दिवसांकरीता प्रति दिवस रु. २०,०००/- त्यांनी मागणी केलेली आहे. सभेमध्ये चर्चा झाल्यानुसार रु. २५,००,०००/- किंवा प्रत्यक्ष हिशोबाप्रमाणे कमी होणारी बाजार वसूली फी ची रक्कम्, लिलावाच्या अटी-शर्ती, कागदपत्रे व करारनामा मुख्य लेखापरीक्षक यांनी तपासून नियमाप्रमाणे बाजार रकमेमध्ये सुट देता येईल किंवा कसे? याचा अहवाल पुढील स्थायी समितीपुढे सादर करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, याच्यामध्ये माझी सुचना समाविष्ट करून घेण्यात यावी. परत त्या क्षेत्रामध्ये फेरिवाले बसले तर ही तरतुद कमी करू नये.

**मा. सभापती :-**

ऑडीटर साहेब, आपण ही सुट दिली आहे ही आत्ता आपण कुठल्या ठिकाणी मायनस करणार आहोत याचे तुम्ही आम्हाला अजून उत्तर दिले नाही.

**दादासाहेब पाटील :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आत्ता जे आपले २५ लाख रूपये कमी होणार आहेत, अशाच पध्दतीचे आपण जे बजेट देतो, त्याच्यामध्ये जमा बाजू आणि खर्च बाजू, अनेक वेळा त्याच्यामध्ये परफेक्ट असे येत नाही. बऱ्याच विषयामध्ये कमी जास्त होते. तर ते कुठल्यातरी एखाद्या विषयामध्ये ते ॲडजस्ट करता येईल. आपल्या बजेटच्या मानाने २५ लाख ही लहान रक्कम आहे.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, तुम्ही ठामपणे सांगू शकत नाही की, कुठे ॲडजस्ट करणार?

**शरद पाटील :-**

ना फेरीवाला क्षेत्रामधून उचलले गेले. त्याचे अपण माफ करतो. हे योग्य की, अयोग्य फक्त याचा आम्हाला खुलासा करा. आपल्या नियमात बसते की, नाही याचा खुलासा करा.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यात आमची सुचना दिली आहे. त्याचा समावेश करून घ्या. आपण त्यांना जी सूट दिलेली आहे. परत जर तिथे. फेरिवाले बसले तर ती सूट देऊ नये.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, अभी पुछा की, जो ना. फेरिवाला क्षेत्र है, उसमे से उनको पहले से वसुली का अधिकार नही था। वो कम करने का अधिकार है क्या?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)सो. :-**

अगर ना. फेरिवाला क्षेत्र मे जो लोग नही बैठते है, पहले से उनसे पाबंदी है। फिर भी इसे पहले वो बैठ रहे थे। और उनसे वसुली हो रही थी। अभी उनको मनाई किया। इसलिए प्रो-रेटा बेसीसपर आप कम कर सकते है यह प्रो-रेटा बेसीसपर ही कम किया गया है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

वो वसुली करने का अधिकार दिया गया था क्या? महापालिकेने दिया था क्या?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)सो. :-**

बाकायदा नही दिया था। लेकिन फिर भी वो वसुली रकर रहे थे। क्योंकी जो ठेका था, वो भाईंदर पूर्व के लिए था। उस हिसाब से वो वसुली कर रहे थे। अब इनको पाबंदी की गयी। इसलिए इसको प्रो-रेटा बेसीस पर आपको रिड्युस करना पडेगा।

**मदन उदितनारायण सिंह :-**

मतलब जो फेरिवाला क्षेत्रेमेसे उठाए गये, वो कम किया जाए और ना-फेरिवाला मे से कम नही किया जाए।

**शरद पाटील :-**

ते फेरिवाला क्षेत्राचा उल्लेख का करत नाहीत? किती फेरिवाला क्षेत्रातून उचलले?आमचे मत आहे, ना-फेरिवाला क्षेत्रामधून नियमात बसून जर ते उचलले गेले असेल आणि त्याची वसुली करण्याचे अधिकार ठेकेदारास नसतील आणि जर त्याची माफी देत असेल तर त्याच्यासाठी आमची मंजुरी नाही.

**वर्षा भानुशाली :-**

मा. सभापती साहब, इनसे पहले रेकॉर्ड मांगीए की, कितना उठाया गया है। मतलब इनको कितना लॉस हो रहा है वो पहले बताइए। इसके बाद आप माफी दिजीए। कितना उठाया गया है, वो नही बता रहे है। सिर्फ इतना अमाऊन्ट कम करना है, वो इन लोगो ने लिख कर दे दिया। मंजुर हो जाने दो लेकिन कितना उठाया वो बताइए। उनको कितना लॉस है? जो ना-फेरिवाला क्षेत्र से वसुल करते थे। तो वो फायदा भी यह लोग नही दिखा रहे है। अब कम करना है, तो कौनसे हिसाब से? पहले बताए की, कितना उठाया है? आपके पास उसका रेकॉर्ड नही है।

**मा. आयुक्त :-**

इसलिए हमने वो लिखा है की, ऑडीटरने चेक करना है की, कितने व्यापारी बैठते थे। २५ रूपये वाले कितने, १५ रूपये वाले कितने, १० रूपये वाले कितने? कितना कम हो सकता है? इसका हिसाब करके दिजीए ऐसा उसमे लिखा है।

**वर्षा भानुशाली :-**

अब डायरेक्ट कम करने का बोल रहे हो और जो पहले ना फेरिवाला क्षेत्र मे बैठते थे, उनसे भी वसुली किया जाता था। तो उसका क्या?

**मा. आयुक्त :-**

पहले सेही, १० बरस हुआ।

**वर्षा भानुशाली :-**

तो वो ॲडजस्ट करो। अब इनको नुकसान हो रहा है.......

**मा. आयुक्त :-**

वो ॲडजस्ट नही हो रहा था।

**वर्षा भानुशाली :-**

अब इनको नुकसान हो रहा है तो इन्होंने लेटर दे दिया। जो फायदा होता था उसका लेटर कभी नही आता। ठेकेदार को बोलो ॲडजस्ट करने का।

**मा. आयुक्त :-**

मॅडम, वो एरिया के सब लोगो ने कॉर्पोरेशन को, मा. महासभा मे भी अभिनंदन का रिझॉल्युशन हो गया। पोलिस डिपार्टमेंट और कॉर्पोरेशन के अधिकारी मिलकर तीन महिने से नही बिठा रहे है। उसका जो नुकसान हुआ है, वो कहॉ से भरेगा?

**वर्षा भानुशाली :-**

जो ना-फेरिवाला क्षेत्र मे से वसुल करता था....

**मा. आयुक्त :-**

वो हम छोड देंगे।

**वर्षा भानुशाली :-**

उसे वो ॲडजस्ट करने को बोलिए।

**मा.आयुक्त :-**

ॲडजस्ट नही होता है।

**वर्षा भानुशाली :-**

ऑलरेडी मिरा भाईंदर इतने कर्ज मे डुबी हुई है। तो यह लॉस क्यो लेने का?

**मा. आयुक्त :-**

उसमे ऑडीटर का नाम डाला है। ऑडीटर व्हेरिफीकेशन करके जितना भी कम करेंगे, वो उसमे डाला हुआ है।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९० भाईंदर (पूर्व) विभागातील बाजार ठेक्याबाबत. मी शेवटचा पॅरा वाचतो. वरील प्रमाणे दिलेली परीस्थीती लक्षात घेता बाजार ठेकेदारास आर्थिक नुकसान सोसावे लागलेले आहे. तरी प्रशासनाकडुन व पोलिस स्टेशन, भाईंदर (पू.) यांचेकडुन होत असलेल्या कारवाईचा विचार करता बाजार ठेकेदार यांना दि. ०९/०९/०९ ते दि. १५/०२/१० पर्यंत १७३ दिवसांकरीता रु. २०,०००/- त्यांनी मागणी केलेली आहे. सभेमध्ये चर्चा झाल्यानुसार रु. २५,००,०००/- किंवा प्रत्यक्ष हिशोबाप्रमाणे कमी होणारी बाजार वसूली फी ची रक्कम, लिलावाच्या अटी-शर्ती, कागदपत्रे व करारनामा मुख्य लेखापरीक्षक यांनी तपासून नियमाप्रमाणे बाजार रकमेमध्ये सुट देता येईल किंवा कसे? याचा अहवाल पुढील स्थायी समितीपुढे सादर करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे ते ऑडीटर ठरवणार ना?

**नगरसचिव :-**

श्री. जुबेर इनामदार यांची सुचना आहे. त्या ना-फेरिवाला क्षेत्रामध्ये परत कोणी बसले. तर त्यांना सुट देण्यात येऊ नये अशी सुचनेसह ठरावाचे वाचन केले.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सुचनेसह वाचून कायम करण्यांत येत आहे. पुढील विषय घेण्यांत यावा.

**शरद पाटील :-**

आम्ही बोलेले सगळे त्याच्यात आले पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, सुचनेमध्ये असे आहे, ना-फेरिवाला क्षेत्र आणि फेरिवाला क्षेत्र हे दोन्ही विषय गोषवाऱ्यामध्ये आहेत. त्या क्षेत्रामधून सुध्दा फेरिवाले उचलेले आहेत.

**प्रकरण क्र. ९० :-**

भाईंदर (पूर्व) विभगातील बाजार ठेक्याबाबत.

**ठराव क्र. ८० :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रत्येक वर्षी बाजार लिलाव करीत असते. या लिलावापासून महानगरपालिकेस ठोस असे उत्पन्न मिळत आलेले आहे. यासाठी एकुण चार बाजार लिलाव क्षेत्र महानगरपालिकेने तयार केलेली आहेत. १) भाईदर (प.) विभाग २) मुर्धा ते चौक ३) भाईंदर (पू.) विभाग (शिवार गार्डन पर्यत) ४) मिरारोड ते चेणा पर्यतचा भाग.

मिरा भाईंदर क्षेत्रामधील भाईंदर (पू.) बाजार लिलाव विभागाकरीता दि. १६/०२/२००९ ते दि. १५/०२/२०१० पर्यत १२ महिन्याच्या कालावधीसाठी बाजार फी वसूली करणे करीता गेल्या वर्षातील १२ महिन्याच्या वसूलीकरीता देकारावर १०% रक्कम वाढवुन म्हणजेच रु. १,०९,०६,५००/- या किंमती पुढे मे. आदिता इंटरप्रायजेस यांनी किमान देकाराच्या पुढे रु. १,१४,०५,०००/- ने बोली पुकारल्याने दि. १२/०२/०९ च्या आदेशाप्रमाणे त्यांना वरील मुदतीकरीता भाईंदर (पू.) विभागाचा बाजार वसूली ठेका त्यांना देण्यांत आलेला आहे.

दि. १६/०२/२००९ पासून मे. आदिता इंटरप्रायजेस यांनी बाजार फी वसूलीस सुरवात केलेली आहे. भाईदर (पू.) बाजार फी लिलाव अटी-शर्ती २००९-१० नुसार एकुण ना-फेरीवाला क्षेत्र अनुक्रमे १ ते २४ व फेरीवाला क्षेत्र १ ते १० आहेत. बाजार वसूलीसाठी ठेकेदारांना नेमुन दिलेल्या क्षेत्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी फेरीवाले बसतात अशा ठिकाणी दैनंदिन बाजार फी वसूली करीत असतात. त्याचप्रमाणेच मे. आदिता इंटरप्रायजेस यांनी दि. १६/०२/२००९ ते दि. ०८/०९/२००९ पर्यत वसूली केली असल्याचे दिसुन येत आहे.

दि. ०९/०९/२००९ पासून महानगरपालिकेचे विभागीय कार्यालय क्र. ०२ येथील अतिक्रमण विभागाकडुन व भाईंदर पोलिस स्टेशन यांचेकडुन फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्रामध्ये बसणाऱ्या फेरीवाल्यांवर सरसकट तीव्र स्वरुपाची कारवाई सतत आजपर्यत चालू आहे. या कारवाई बाबत त्यांनी वेळोवेळी महानगरपालिकेस पत्रव्यवहार केलेला असून अशा प्रकारची कारवाई करु नये अशी विनंती केलेली आहे. ना-फेरीवाला क्षेत्राबरोबरच फेरीवाला क्षेत्र व जेथे ना-फेरवाला क्षेत्र नाही अशा ठिकाणीही भाईंदर (पू.) पोलिस स्टेशन यांचेकडुन निरंतर कारवाई होत असल्याने बाजार फी वसूलीवर परिणाम होउन नुकसान होत असल्याबाबत ठेकेदार मे. आदिता इंटरप्रायजेस यांनी महानगरपालिकेस कळविले आहे.

मे. आदिता इंटरप्रायजेस यांनी दि. २७/११/०९ व दि. ३०/११/०९ रोजी महानगरपालिकेस पत्र देउन प्रभाग कार्यालय व पोलिस विभागाकडुन होत असलेल्या कारवाईबाबत कळविलेले असून सदर कारवाईमुळे त्यांना दरारोज रु. २० ते २२ हजाराचे आर्थिक नुकसान सोसावे लागत असल्याचे नमुद केले आहे. मे. आदिता इंटरप्रायजेस यांना दररोज महानगरपालिकेकडे रु. ३१,२००/- प्रतीदिन हफ्ता भरावयाचा आहे. आतापर्यत ठेकेदार यांनी एकुण बाजार हफ्त्यापैकी रु. ८२,५०,०००/- रक्कम भरलेली आहे.

वरील प्रमाणे दिलेली परीस्थीती लक्षात घेता बाजार ठेकेदारास आर्थिक नुकसान सोसावे लागलेले आहे. तरी प्रशासनाकडुन व पोलिस स्टेशन, भाईंदर (पू.) यांचेकडुन होत असलेल्या कारवाईचा विचार करता बाजार ठेकेदार यांना दि. ०९/०९/०९ ते दि. १५/०२/१० पर्यत १७३ दिवसांकरीता प्रति दिवस रु. २०,०००/- त्यांनी मागणी केलेली आहे. सभेमध्ये चर्चा झाल्यानुसार रु. २५,००,०००/- किंवा प्रत्यक्ष हिशोबाप्रमाणे कमी होणारी बाजार वसूली फी ची रक्कम, लिलावाच्या अटी-शर्ती, कागदपत्रे व करारनामा मुख्य लेखापरीक्षक यांनी तपासून नियमाप्रमाणे बाजार रकमेमध्ये सुट देता येईल किंवा कसे? याचा अहवाल पुढील स्थायी समितीपुढे सादर करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. सुधा व्यास** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**सदर ठरावामध्ये सन्मा सदस्य श्री. जुबेर इनामदार यांनी खालील सुचना मांडली.**

ज्या कारणाकरीता सुट देण्यांत आली आहे. त्या क्षेत्रामध्ये जर कोणताही फेरीवाला माल विक्री करताना बसलेला आढळल्यास ठेकेदारास सदर दिलेली सुट रद्द करण्यांत येईल. सदर सुट ठेकेदाराचा ठेका संपल्यानंतर देण्यांत येईल. अशी मी सुचना मांडत आहे.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

मा. आयुक्त सो., त्यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन. प्रकरण क्र. ९१, ९२, ९३,९४ चारही संगणक विभागाचे अवलोकनाची प्रकरणे आहेत.

**मा. सभापती :-**

सदरची प्रकरणे ही आपल्याकडे अवलोकनासाठी आली आहेत. आपण चारही विषयांना मंजुरी देतो.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण सेसच्या वेळेला खरेदी केलेली जी जुनी यंत्रणा आहे, कॉम्प्युटर वगैरे, ते कोणकोणत्या ठिकाणी आहेत आणि ते बरोबर आहेत की, नाहीत?

**सिमा मिश्रा :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या मान्यतेने बोलते. एकूण १८ कम्प्युटर, १ सर्व्हर आणि १ हेवी ड्युटी प्रिंटर असे धरून ५ नेटवर्क प्रिंटर घेतले होते. ते दोन प्रिंटर आणि ११ कम्प्युटर सीएफसी मध्ये कार्यान्वीत केलेले आहेत. आणि वेगवेगळ्या विभागांना बाकीचे.

**अनिल सावंत :-**

मग सीएफसी मध्ये पहिले कम्प्युटर नव्हते का?

**सिमा मिश्रा :-**

तीन वर्षापासून काही संगणक पार्ट गेल्यामुळे बंद झालेले. एकूण २१.

**अनिल सावंत :-**

आता स्थानिक कर सुरू होते आहे. मग तुम्ही त्या डिपार्टमेंटसाठी परत कम्प्युटर घेणार का?

**सीमा मिश्रा :-**

परत घ्यावे लागतील. कारण जे बंद पडले त्यांची दुरूस्ती एक नवीन संगणक खरेदी करणेकामी इक्वल येते.

**शरद पाटील :-**

ते बंद पडले कसे? आपण त्यांची देखभाल ठेवलीच नाही का?

**सीमा मिश्रा :-**

त्याचे पार्ट गेले. इलेक्ट्रॉनिक पार्टचे .....

**शरद पाटील :-**

त्याची काही गॅरेन्टी-वॉरन्टी होती की, नाही?

**सीमा मिश्रा :-**

तीन वर्ष होती.

**शरद पाटील :-**

मग त्यांना आणून आत्ता किती वर्ष झाली?

**सीमा मिश्रा :-**

कमीत कमी पाच ते सहा वर्षे झाली.

**शरद पाटील :-**

कसे काय सेस लागून पाच वर्षे होतील?

**सीमा मिश्रा :-**

सेस नाही. जे कम्प्युटर बंद झालेले.

**अनिल सावंत :-**

सेससाठी आपण कम्प्युटरायझेन वगैरे केले. कम्प्युटर घेतले. मला वाटते त्याच्यासाठी ४० लाखाची मंजुरी घेतलेली. तेवढे कम्प्युटर त्यांनी आणले होते.

**सीमा मिश्रा :-**

दहा लाखापर्यंत. एकूण १८ कम्प्युटर्स आणि ५ प्रिंटर्स घेतले होते.

**अनिल सावंत :-**

मग त्याच्या पूर्वी जे कम्प्युटर घेतले. ते एका वर्षामध्ये तुम्ही घेतलेले कम्प्युटर एवढ्यात खराब झाले? किती वर्षाची वॉरन्टी होती.

**सीमा मिश्रा :-**

सेसचे संगणक व्यवस्थितरित्या चालू आहेत. पूर्वी भांडार आणि संगणक विभागाने २००३-०४ वर्षामध्ये जे घेतलेले होते. ते बंद पडले आहेत.

**शरद पाटील :-**

आत्ता मी तुम्हाला काय विचारले. आत्ता जे सेसच्या वेळेला जे संगणक घेतले होते. त्याची सध्या काय परिस्थिती आहे. ते आम्हाला सांगा. आणि किती आहेत?

**सीमा मिश्रा :-**

सुव्यवस्थित चालू आहेत. एकूण १८ संगणक संच आहेत. आणि ५ प्रिंटर्स आहेत.

**शरद पाटील :-**

सगळे चालू आहेत.

**सीमा मिश्रा :-**

होय.

**शरद पाटील :-**

आणि आत्ता कोणकोणत्या डिपार्टमेंटची दुरूस्ती करण्यांत येणार आहे, त्याची आम्हाला लेखी माहिती दया.

**सीमा मिश्रा :-**

माझ्याकडे आहे. मी देते.

**चंद्रकांत मोदी :-**

मॅडम, वो बंद हुआ है, वो चालू होगा की, नही होगा?

**सीमा मिश्रा :-**

उसके लिए मैने एक रिपेअरिंग कंपनीसे कोटेशन मँगाया। उनकी रिपेअरिंग गे इक्वल टू परचेस ऑफ ए न्यु मशीन. सो वि श्युल्ड गो फॉर परचेस ऑफ न्यू मशीन. ॲटेस्ट वी व्हिल गेट ३ ईअर्स वॉरंटी.

**अनिल सावंत :-**

वि डोन्ट हॅव सर्विस कॉन्ट्रक्ट.

**सीमा मिश्रा :-**

वि हॅव, बट इट इझ नॉन कॉम्पंसिव्ह विथ अवर पार्टस.

**अनिल सावंत :-**

वाय् यु आर डुइंग नॉन कॉम्प्रंस्विह करो ना.

**सीमा मिश्रा :-**

ओके. आय विल.

**जुबेर इनामदार :-**

प्रपोजल मागवा ना. लेट्स सी वॉट इझ द कॉस्ट ॲण्ड वॉट.

**अनिल सावंत :-**

हार्डवेअर, सॉफ्टवेअर दोनो मे फायदा रहेगा। वो ज्यादा फरक नही होता है। मा. सभापती साहेब, मी एक पत्र दिले होते तो विषय.

**ग्रिटा फॅरो :-**

मा. सभापती साहेब, महिला बालकल्याण अंतर्गत चालणारा कम्प्युटर व्यवस्थित आहे का, हे त्यांना विचारा. कारण त्या दिवशी मी गेलेली तेव्हा तो व्यवस्थित नव्हता. त्यांना विचारा.

**सीमा मिश्रा :-**

मा. सभापती साहेबांच्या मान्यतेने बोलते. महिला बालकल्याण संगणक त्यांच्या विभागामार्फत घेण्यात आलेला आहे. तरीही आम्ही ते दुरूस्त करून दिले आहे. प्रिंटर बंद झालेला होता. टॅफ्लॉन फाटला होता.

**ग्रिटा फॅरो :-**

त्यांच्या अंतर्गत झाले तर तुम्ही रिपेअरिंगचे बघतच नाही का?

**सीमा मिश्रा :-**

आम्ही बघतो.

**ग्रिटा फॅरो :-**

मग, किती दिवस झाले? नाही मग तुम्ही सांगायचे.

**सीमा मिश्रा :-**

त्यांचा संगणक संच व्यवस्थित होता. प्रिंटरचा टॅफलॉन गेलेला होता.

**ग्रिटा फॅरो :-**

या गोष्टीला २ महिने झाले.

**सीमा मिश्रा :-**

आम्ही वेळेत दुरूस्त करून दिला आहे.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम आपण कारटेज रिपेअरिंगचे करणार होते. ते सुरू केले का ?

**सीमा मिश्रा :-**

सध्या नवीन प्रस्तावाला साहेबांनी मंजुरी दिलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आपल्याकडे जे काटरेज आपण वापरतो, ते ८००-८५० रूपयाला एक काटरेज येतो आणि कंपनीवालेच ते १२० रूपयाला रिफील करून देतात आणि तेच काटरेज आपण ८-१० वेळा वापरू शकतो.

**सीमा मिश्रा :-**

रिफीलींग आणि रिफर्निशिंग हे दोन वेगवेगळे मुद्दे आहेत. रिफीलींग केल्यानंतर प्रिंटरची वॉरंटी वॉइर होते.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मागच्या सभेमध्ये मी साफसफाई कॉन्ट्रॅक्टरच्या संदर्भात बोललो होतो की, त्यांनी येऊन माझ्याकडे भेट घेतली आणि त्यांनी त्या संदर्भात सांगितले की, तुम्हाला याच्यापुढे तक्रार येणार नाही आणि मी त्याची काळजी घेऊन. आणि जी माणसे मी पुरवठा करतो त्याच्यामध्ये कुठेही मी पडणार नाही अशी कबुली त्यांनी दिलेली आहे. तर आपण त्याला कार्यरत ठेवावे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, एक विषय असा आहे. हे जे गोषवारे येतात. ते अजेंडाच्या जोडीला आले तरच आम्ही तो विषय घेऊ. नाही तर, नंतर आले तर तो विषय पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात येईल. कारण आमची गटाची मिटींग असते. ते बोललो नाही तर आम्हाला त्याच्यातील काही माहिती पडणार नाही. त्याच्यामुळे ते गोषवारे त्याच दिवशी आले पाहिजेत.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, आमच्याकडे डिपाटमेंटवाईज काही विषय येतात. आमच्याकडे काही विषयाचे गोषवारे काल आलेत त्यामुळे त्यावर अभ्यास वगैरे करता येत नाही आणि अचानक विषय येतात त्यावेळेला इकडे आमची अडचण होते. कृपया, प्रत्येक डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांकडून आम्हाला ज्या वेळेला विषयपत्रिका येईल त्याच वेळेला गोषवारा यावा. अदरवाईस, जर गोषवारा समोर आला नाही, तर सचिव साहेब, आम्ही तो विषय घेणार नाही. आयत्या वेळेस विषय आला तर त्रास होतो.

**मा. आयुक्त :-**

आत्तापर्यंत असे सजेशन आलेले नाही. पहिल्यांदा आले आहे. सर्व अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी आणि अजेंडा काढण्यापूर्वी गोषवारा पाठवावा. म्हणजे सचिवांना विषयपत्रिका पाठवता येईल.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेबांनी चांगली सुचना केलेली आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो.

**प्रकरण क्र. ९१ :-**

**<u>मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)</u>**
मिरा भाईंदर महानगरपालिका सन २००९-१० सालाच्या मालमत्ता कर मागणी बिल, मागणी नोटीस, इतर अहवाल छपाईकामी संगणक स्टेशनरी खरेदी करणे.

**ठराव क्र. ८१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सन २००९-१० सालाच्या मालमत्ता कर मागणी बिल, मागणी नोटीस, डिमांड रजिस्टर, क्लोजिंग रजिस्टर, थकबाकी रजिस्टर, संगणकीकृत पावती इतर अहवाल छपाई करणे कामी संगणक स्टेशनरीची अत्यंत तातडीने आवश्यकता आहे. सदर कामी मे. साई प्रिंटींग ॲन्ड स्टेशनरी व मे. वोरा इंटरप्रायझेस यांचे वार्षिक निविदेतील दर मंजुर असून मंजूर दराप्रमाणे संगणक स्टेशनरीची खरेदी करणेकामी मा. आयुक्त सो यांनी दि. ०६/०८/०९ रोजी मंजुरी दिलेली आहे. या कामी ६ लाख एवढा खर्च झालेला आहे.

वरील प्रमाणे प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल ७३ (ड) नुसार अवलोकन करण्यात येत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ९२ :-**

**<u>मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)</u>**
मिरा भाईंदर महानगरपालिका सन २००९-१० सालाच्या मालमत्ता कर मागणी बिल, मागणी नोटीस, इतर अहवाल छपाईकामी संगणक कन्झुमेबल (उदा. टोनर व कार्टेज इ.) स्टेशनरी खरेदी करणे.

**ठराव क्र. ८२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सन २००९-१० सालाच्या मालमत्ता कर मागणी बिल, मागणी नोटीस, डिमांड रजिस्टर, क्लोजिंग रजिस्टर, थकबाकी रजिस्टर, संगणकीकृत पावती इतर अहवाल छपाई करणे कामी संगणक कन्झुमेबल स्टेशनरीची अत्यंत तातडीने आवश्यकता आहे. सदर कामी मे. वोरा इंटरप्रायझेस व मे. ओम साई एटरप्रायझेस यांचे वार्षिक निविदेतील दर मंजुर असून मंजूर दराप्रमाणे संगणक कन्झुमेबल स्टेशनरीची खरेदी करणेकामी मा. आयुक्त सो यांनी दि. ०६/०८/०९ रोजी मंजुरी दिलेली आहे. या कामी १० लाख एवढा खर्च झालेला आहे.

वरील प्रमाणे प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल ७३ (ड) नुसार अवलोकन करण्यात येत आहे.

सही/-
सभापती
स्थायी समिती सभा
मिरा भाईदर महानगरपालिका

**प्रकरण क्र. ९३ :-**

**मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)**

संगणक विभागासाठी नविन हेव्ही ड्युटी प्रिंटर खरेदी करणे.

**ठराव क्र. ८३ :-**

मिरा भाईदर महानगरपालिका संगणक विभागामार्फत सर्व प्रभाग कार्यालयाचे सन २००९-१०च्या मालमत्ता कराची बिले तसेच क्लोजिंग रजिस्टर,डिमांग रजिस्टर, मागणी नोटीसा छपाई व पाणी पुरवठा विभागाचे संगणकीकरण करण्यात आले असून पाणी पुरवठा बिलांच्या छपाई करणे करिता हेव्ही ड्युटी लेझर प्रिंटरची आवश्यकता होती. सदर कामी शासन दरपत्रकानुसार (Government of India Directorate General of Supplies and Disposals) माहे जुलै २००९ मध्ये HP९०४० डि.एन. प्रिंटर रु. १,५१,१२४/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आला आहे.

सदर प्रिंटर खरेदी करणेस मा. आयुक्त सो. यांनी दि. २४/०७/२००९ रोजी मंजुरी दिलेली आहे. वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात येत आहे.

सही/-
सभापती
स्थायी समिती सभा
मिरा भाईदर महानगरपालिका

**प्रकरण क्र. ९४ :-**

**मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)**

मिरा भाईदर महानगरपालिका विविध विभागातील संगणक, प्रिंटर, सर्वर व इतर साहित्य वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे.

**ठराव क्र. ८४ :-**

मिरा भाईदर महानगरपालिक विविध विभागातील संगणक, प्रिंटर सर्वर व इतर साहित्य वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे कामी दि. ०३/०१/२००९ रोजी दै. लोकमत व दै. फ्रिप्रेस या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध केली असता एकुम तीने ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत. मुदतीत सादर केलेल्या निविदाधारकांपैकी मे. के.जे.एम. ग्रुप सिस्टिम सोलूशन ठेकेदाराच्या सर्वात कमी दराच्या निविदेस मा. आयुक्त सो. यांनी दि. ०६/०८/०९ रोजी मंजुरी दिलेली आहे. सदर कामी रु. ५ लाखापर्यंत खर्च अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल ७३ (ड) नुसार अवलोकन करण्यात येत आहे.

सही/-
सभापती
स्थायी समिती सभा
मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. सभापती :-**

आज खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आपण ही सभा पार पाडली. त्याबद्दल सर्व सन्मा. सदस्यांचे मी आभार मानतो आणि आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.१५ वा.**

सही/-
सभापती
स्थायी समिती सभा
मिरा भाईदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दि.**०७।०५।२०१०

॥ गोषवारा ॥

**प्रकरण क्रमांक** (२६) - मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मैदानाचे भाडे ठरविणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी मैदाने विकसित करण्यात आलेली आहेत.

१) भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदान

२) भाईंदर (पूर्व) नवघर शाळा मैदान

३) भाईंदर (पूर्व) जैसल पार्क चौपाटी मैदान

४) मिरारोड आरक्षण क्र. १७० मैदान

वरील पैकी आ.क्र.१,२ व ३ मैदाने भाडयाने देण्याबाबत यापूर्वी झालेले मा.स्थायी सभेचे ठराव सोबत जोडण्यात आलेले आहेत. भाईंदर (पूर्व) जैसल पार्क चौपाटी वरील मैदान भाडयाने देण्याबाबत रु.५०००/- व रु.१०,०००/- अनामत रक्कम ठरविण्यात आलेली आहे. शाळांचे कार्यक्रम वगळून इतर कार्यक्रमाकरीता मैदान भाडयाने देण्याकरिता सर्व मैदानाचे समान भाडे असणे आवश्यक आहे. तरी सर्व मैदाने भाडयाने देण्याकरिता रु. ५०००/- भाडे व रु. १०,०००/- अनामत रक्कम ठरविणेबाबत निर्णय होण्यांस शिफारस आहे.

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

CHM/DK/2010-11/G5

દિ ૧૬।૬।૧. રોજે
૫-૧૦ વા. પ્રાપ્ત

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०५।०५।२०१०
## // टिपण्णी //

**प्रकरण क्र. :-** २७ **MMRDA कडील कर्ज परतफेड करणेबाबत.**

MMRDA बांद्रा मुंबई विकास प्राधिकरणाकडून महापालिकेने 50 MLD पाणी योजना, रेल्वे उड्डाणपूल, डि. पी. रोड विकसित करणेसाठी कर्ज घेतलेले आहे. सदर कर्जाची परतफेड सहामाही हप्त्यामध्ये करावयाची आहे. आजतागायत MMRDA कडील कर्ज परतफेडीचा एक ही थकित हप्ता नाही. १ एप्रिल २०१० पासून शासनाने जकात कर बंद करून स्थानिक संस्था कर लागू केलेला आहे. जकातीचे उत्पन्नाचे प्रमाणात स्थानिक संस्था कराचे उत्पन्न पाहता व दरमहा अत्यावश्यक सेवांवरील करावा लागणारा खर्च पाहता माहे जून २०१० अखेरचा कर्ज परतफेडीचा हप्ता रु.४९४२३९९१ वेळेत भरणा करता येणार नाही. MMRDA ने जकात कराचे उत्पन्न विचारात घेवूनच पुढील योजनांसाठी यामध्ये भुयारी गटार योजनेसाठी २२६ कोटी रूपये कर्ज मंजूर केलेले आहे. कर्ज परतफेड करण्यास महापालिका सक्षम नसेल तर भुयारी गटार योजनेसाठी मंजूर करण्यात आलेले कर्ज वितरणात MMRDA कडून अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी माहे जून २०१० चा कर्ज परतफेड हप्ता वेळेत भरण्यासाठी "कर्जपरतफेड राखीव निधी" मधील रक्कम रुपये ४,९४,२३,९९१/- मुदतपूर्व काढून उर्वरित रक्कम मनपा जनरल फंडावरुन भरावी लागणार आहे. यास्तव MMRDA कडील कर्जपरतफेड करण्यासाठी "कर्जपरतफेड राखीव निधी" मधील गुंतवणूक मुदतपूर्व काढून कर्ज हप्ता भरण्यास मा. स्थायी समितीचे मंजुरीस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्राप्त

16/6/2010

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०६/०६/२०१०

## // गोषवारा //

प्रकरण क्र. :-(२८) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) हॉस्पीटल मधील ब्लड बँक करीता वाहानुकुलित यंत्रणा बसविणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १९२/१९३ येथे सुसज्य असे हॉस्पीटल इमारत बांधण्यात आलेली असून सदर इमारतीमधील ब्लड बँक ऑपरेशन थिअटर येथे वातानुकुलीत यंत्रणा आवश्यक त्या साहित्यसह बसविणे गरजेचे आहे. सदर कामी रु. १२,४९,९५०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी "मिरारोड हॉस्पीटल" या लेखाशिर्षखाली रु. २०,००,०००/- इतकी तरतुद उपलब्ध आहे.

तरी सदर कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

10-11/DKV/SG

પ્રાપ્ત તા. ૧૭/૬/૯૦

[illegible]

૧૭/૬/૯૦

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.०६/०७/२०१०

// गोषवारा //

प्रकरण क्र. :- २९   मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजीकरण व लसीकरणाच्या कामास मुदतवाढ देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे कामी उत्तन येथे प्रकल्प सुरु आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्रे पकडुन सदर प्रकल्पात निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण करुन उपचाराअंती मुळ ठिकाणी सोडण्यात येतात.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरणाचे काम यापुर्वी मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी या संस्थेस देण्यात आले आहे. निविदाकाराची देयके अदा करणेस सन २०१०-११ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त या लेखाशिर्षाखाली १० लाखाची तरतुद करण्यात आली आहे. मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी या संस्थेस मोकाट कुत्र्यांचे व निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरणाच्या कामास मुदतवाढ देणेस शिफारस असे.

मा. आयुक्त सो., यांच्या मान्यतेने

उप-आयुक्त (पशुसंवर्धन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्राप्त मि. 22/0६/2070

प्रकरण क्र.३०

एमएमआरडीएकडून निर्मल अभियान अंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयाच्या कामाचा आढावा घेणे.

प्रशासनाकडून गोषवारा नाही.

प्रकरण क्र. ३१

पाणी पुरवठा विभागाच्या कामाचा आढावा घेणे.

प्रशासनाकडून
गोषवारा नाही.

प्रकरण क्र.३२

माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत देणेबाबत.

प्रशासनाकडून गोषवारा देण्यात आलेला नाही.

प्रकरण क्र. ३३

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत प्लास्टीक पिशव्यांवर बंदी घालणेबाबत.

प्रशासनाकडून गोषवारा देण्यात आलेला नाही.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

लेखापरिक्षण विभाग

स्व. इंदिरा गांधी भवन, श्री. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

स्थायी समिती सभा दि. ७/७/२०१०

## // टिप्पणी //

गोषवारा

**प्रकरण क्र. :- ३४ मा. पदाधिकारी व अधिकारी यांना बॅगा खरेदीबाबत...**

दरवर्षीप्रमाणे मा. पदाधिकारी व अधिकारी यांना बजेट सादर करताना बॅगा दिल्या जात असतात. यावर्षीही सन २०१०-११ चे अंदाजपत्रकासोबत बॅगा वाटपासाठी जनमत या वृत्तपत्रामध्ये जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करुन दर मागविण्यात आलेले होते. यामध्ये खालीलप्रमाणे सर्व करांसह दर प्राप्त झालेले होते.

१) मे. मुदीर लेदर वर्क्स 4303/-

२) मे. फ्लोरेन्स लेदर 4400/-

३) मे. मुस्कान एंटरप्रायजेस 4450/-

वरील प्राप्त दर पाहता मे. मुदीर लेदर वर्क्स यांचे कमीत कमी दर स्विकारणेत आलेले होते. त्यानुसार त्यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. कार्यादेशाप्रमाणे त्यांनी 151 बॅगा पुरविलेल्या आहेत. त्यांचे देयक रक्कम रुपये 6,49,753/- अक्षरी रुपये सहा लक्ष एकोणपन्नास हजार सातशे त्रेपन्न मात्र BPMC ACT 1949 चे कलम 73(D) नुसार प्रदान करणेत आलेले आहे. कृपया मा. स्थायी समिती सभेचे अवलोकनार्थ सादर.

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका